।। अथ श्रीमुद्गलपुराणे चतुर्थः खंडः प्रारभ्यते ।।

ॐ श्रीगणेशाय नमः । शौनक म्हणती सूतासी । महोदरचरित्र कथिलेसी । शांतिप्रद मोहविनाशी । आम्हांसी महाप्राज्ञा तूं ।।१।। तें ऐकूनही तृप्ति न होत । पुनःपुन्हा पिऊन जैसें अमृत । याच्यासम अन्य नसत । ऐसा अनुभव आमुचा असे ।।२।। म्हणून गजाननाचेंही चरित । सांग विस्तारें आम्हांप्रत । सर्वज्ञ तूं महाभागा निश्चित । भाग्यवंत आमुच्या मतें ।।३।। मुद्गल दक्षांचा संवाद । सांग आम्हा तूं मानद । त्या सुबुद्धी ब्रह्मपुत्रें सुखद । पुढती काय विचारिलें? ।।४।। सूत म्हणती तें ऐकून । ऐक भार्गव विप्रेन्द्रा महाज्ञान । गजाननाचें माहात्म्य गहन । ऐकलें तैसें सांगतों ।।५।। महोदराचें आख्यान ऐकून । नाना उपाख्यानयुक्त पावन । मोहनाशकर तें प्रसन्न । जाहला दक्ष अत्यंत ।।६।। पुनरपि मुद्गलास तो म्हणत । योगीन्द्रा वेदपारगाप्रत । विनयगुणानें युक्त । गणेशज्ञानीं लालसा ज्यासी ।।७।। महोदराचें माहात्म्य ऐकिलें । तेणें मोदयुक्त चित्त झालें । आतां पाहिजे सांगितलें । गजाननाचें चरित्र तूं ।।८।। हा अवतार कोणत्या रूपांत । कोणतें हें ब्रह्म असत । तो देहधारी कां होत । कोणतें कार्य कोणते गुण ।।९।। हें सर्व तूं मुनिसत्तमा । सांग महामते मज अभिरामा । धन्य कथा शुभा निरुपमा । ही सर्व सांग आम्हां ।।१०।। पूर्व पुण्याच्या प्रभावें लाभत । संगत तुझी पुनीत । धन्य मी एक संसारात । ऐकेन सारें मनोभावें ।।११।। सूत सांगती शौनकास । दक्ष म्हणे ऐसे मुद्गलास । तेव्हा त्या महायोग्यास निवेदित । भावज्ञ गाणपत्यपरायण ।।१२।। अरे बुद्धिमंता दक्षा महाभागा । धन्य होशील तूं जगा । यांत संशया न जागा । गणेशकथा तूं वाढविसी ।।१३।। ही योगदा कथा सांगेन । तुझ्या मनोभावें मी

प्रसन्न । योगशांतिप्रद माहात्म्य पावन । सांगतों तुज गजाननाचें ।।१४।। तेच सांख्य ब्रह्म विदेह कथिती । योगीजन परम प्रीती । तेंच हें गजानन मुख निश्चिती । ऐसें जाण तूं प्रजापते ।।१५।। बिंदुमात्रात्मक देह असत । सोऽहं हें वक्त्र ख्यात । त्यांचा अभेदभाव धारण करित । देहरूप तो गजवक्त्र ।।१६।। त्रिविधांत गणेश देव स्थित । तथापि जसे त्यांनी वर्णित । विदेह गजवक्त्र शोभत । सांख्यधारक वक्रतुंड ।।१७।। बोधत्याग होता करित । कोण संख्या महाभागा जगांत । ब्रह्माची तेणें सांख्य प्रकाशित । वेदांत नादब्रह्मरूपें ।।१८।। लोभासुर विनाशार्थ प्रकटला । गजानन जो देवांनी प्रार्थिला । विप्रांनी ज्यास प्रजानाथा प्रार्थिला । भक्तिलालस एकदन्त ।।१९।। चतुर्थी तिथीस माध्यान्हीं अवतरत । ती तिथी त्यास प्रिय असत । सूत म्हणती शौनकाप्रत । हें ऐकून दक्ष विचारी ।।२०।। ही चतुर्थी तिथि सांगसी । तिजविषयीं विशेष सांगा मजसी । शुक्ला कृष्णा या भेदासी । स्पष्ट करी तूं मुद्गलमुने ।।२१।। ही तिथि गणनाथाप्रत । कां जाहली प्रिय अत्यंत । पुनःपुन्हा शुभ हें व्रत । सांगितलें तुम्ही म्हणून प्रश्न ।।२२।। तरी चतुर्थीचें महिमान । सांगा सकल मजला महान । दक्षाचें हें वचन ऐकून । हर्षयुक्त झाला महामुनी ।।२३।। मुद्गल नंतर त्यास सांगती । चतुर्थी व्रताची कथा प्रीती । ती संक्षेपें तुज सांप्रतीं । सांगेन मीं शौनका ।।२४।। पूर्वी सृष्टी निर्माण करून । ब्रह्मा लोकपितामह उन्मन । तेथ स्थित प्राण्यांच्या कालार्थ मन । एककेन्द्रित तैं करी ।।२५।। नाना कार्ये सिद्ध होण्यास । हृदयीं चिन्ती गणपास । ध्यान धरून करी प्रार्थनेस । तेव्हा नवल एक घडलें ।।२६।। त्याच्या शरीरांतून प्रकृति । महामाया जी व्यक्त झाली जगतीं । तिथींची ती जननी होती । चतुष्पदा कामरूपिणी ।।२७।। चतुर्हस्ता सुशोभित । ती चतुर्मुखयुक्त असत । तिज पाहून

हर्षयुक्त । जाहला तैं प्रजापती ।।२८।। नंतर ती त्यास नमून । जगदीश्वरा तोषवी स्तवून । नाना स्तोत्रांनी प्रसादन । घन:निस्वन ती करी ।।२९।। प्रकृती म्हणे प्रजापतीप्रत । तुझ्या अंगांतून नि:सृत । मज जाण ब्रह्मांडनायका सांप्रत । आज्ञा करी जनका मज ।।३०।। मीं करीन जें सांगाल तें त्वरित । आपुली मीं भावयंत्रित । स्थान भक्ष्यादी द्यावें मजप्रत । नाना भोगादिक प्रभो ।।३१।। मज दयासिंधो द्यावें समस्त । परमेश्वरा मी तुज नमत । तिचें हें वचन ऐकून म्हणत । ब्रह्मदेव प्रकृतीस ।।३२।। हे मानदे गणेशाचें चिंतन । करून निर्मी सृष्टी परम । विचित्ररूपा प्रसन्न । तिजला मग दे षडक्षर मंत्र ।।३३।। गणेशाचा तो मंत्र मिळत । तदनंतर ती प्रणाम करित । विधिपूर्वक ब्रह्मदेवाप्रत । वनांत गेली तप करण्या ।।३४।। नासाग्र दृष्टी लावित । उग्र तप ती आचरित । गणेशास ध्यात हृदयांत । जप करी मंत्रोत्तमाचा ।।३५।। ऐसीं सहस्र वर्षें जात । तेव्हां गजानन प्रकट होत । महाभागेच्या समोर मोदयुक्त । भक्तवत्सल तिज म्हणे ।।३६।। वर माग महाभागे त्वरित । मनोवांच्छित जे असत । निराहार तपानें मुदित । संतुष्ट मीं तुज देईन ।।३७।। त्याचें तें वचन ऐकून । अत्यंत हर्षित ती त्यास नमून । स्तवन करी कर जोडून । भावभक्तीनें संपृक्त ।।३८।। मूषकवाहास मूषकध्वजास । स्वानंदपतीस गणपतीस । सिद्धिबुद्धिप्रदात्यास । सिद्धिबुद्धिविहारा तुज नमन ।।३९।। योगेशासी शांतिप्रदासी । योग्यासी सर्वादीसी । सर्वपूज्यासी भक्तपालकासी । ज्येष्ठराजासी वंदन ।।४०।। ज्येष्ठपतीसी ब्रह्मासी । ब्रह्मदात्यासी ब्रह्मपतीसी । सिद्धेश्वरासी देवपतीसी । दैत्यपतीसी नमन असो ।।४१।। चतुर्भुजासी हेरंबासी । परशुधारकासी निरंकुशासी । अंकुशधारकासी सृष्टिकर्त्यासी । रजोगुणप्रभावें, नमन ।।४२।। सात्त्विक गुणें पालनकर्त्यासी । तामसगुणे

संहर्त्यासी । गणेशासी स्थावरासी । चरासी चराचरमया नमन ।।४३।। चराचरविहिनासी । बोधासी चतुर्विधस्वरूपासी । चतुर्विधसुखप्रदासी । स्वसंवेद्यासी नमन ।।४४।। चतु:सुखस्वरूपासी । विनायकासी सर्वनायकासी । गजाननासी देवासी । देवदेवेशा तुज नमन ।।४५।। काय स्तुती करू मी पामर । योगी वेदमुख्यही जेथ मानिती हार । ब्रह्मणस्पतिरूपा उदार । तू एक गणाध्यक्ष विश्वांत ।।४६।। तथापि तुझ्या दर्शनें प्रोत्साहित । मी अज्ञ तुझें स्तोत्र गात । त्यानें तुष्ट होऊन मजप्रत । दृढ भक्ती तुझी देई ।।४७।। ऐसी स्तुती करून । गणेशास करी वंदन । तिज वरती उठवून । गणाधीश व्रतमातेस म्हणे तदा ।।४८।। वर माग महाभागे इच्छित । तो मी देईन सुप्रीत । भक्तीनें स्तोत्रें संतोषित । तुझें स्तोत्र हें मज प्रिय ।।४९।। तुझी ही स्तोत्ररचना वाचील । अथवा जो ती ऐकील । तो सर्व इप्सित लाभेल । मनुष्यमात्र हें निश्चित ।।५०।। एकदा दोनदा वा त्रिकाल । वाचनें लाभेल फळ अमल । व्रती व्रताचें साफल्य विमल । यांत संशय कांहीं नसे ।।५१।। ऐसें गणनाथ सांगत । तेव्हां गंभीर स्वरें ती प्रार्थित । प्रणाम करुन तयाप्रत । अश्रुपूर्ण नेत्रभावोत्कट ।।५२।। वरद जरी गणाधीशा मजप्रत । करी स्थिर भक्ति तुझी चित्तांत । सामर्थ्य दे माझ्या कार्यांत । करुणानिधे सर्वदा ।।५३।। सृष्टिनिर्माणाचें सामर्थ्य अद्भुत । द्यावें मज गणनाथा सतत । तुझीं प्रिय होऊन जगांत । विरह तुझा न व्हावा ।।५४।। तथास्तु गणाधीश म्हणत । चतुर्विधप्रदा तूं जगांत । मजला प्रिय अत्यंत । होशील तूं निस्संशय ।।५५।। तिथींच्या मातृभावें ख्यात । चतुर्थी नामें तूं जनांत । वामभागी कृष्णा असत । शुक्ला सदा दक्षिण भागीं ।।५६।। माझी जन्म तिथी होशील । तुझें व्रत जे पाळतील । त्या सर्वांस लाभेल । संरक्षण माझें निश्चित ।।५७।। माझ्या

व्रताची पुण्योक्ती ख्यात । व्रतांत तुजसम व्रत नसत । फलदायक तिथी तूं सर्वांत । श्रेष्ठ उत्तम होशील ।।५८।। ऐसें बोलून गजानन । त्वरित पावले अन्तर्धान । व्रतमाता प्रजानाथा ती महान । राहिली चिंतनीं निमग्न ।।५९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते चतुर्थीतपोवर्णनं नाम प्रथमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु।

(अध्याय पहिला संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । मुद्गल सांगती दक्षाप्रत । प्रकृति गणाध्यक्षास मनीं स्मरत । सृष्टि निर्माण करण्या इच्छित । दोन भाग झाले तिचे ।।१।। चतुर्थी संज्ञक प्रकृतीचा वाम भाग । कृष्ण वर्ण झाला सुभग । शुक्ल वर्ण जाहलें दक्षिणांग । तें पाहून विस्मित झाली ।।२।। पुनः गणपतीचें ध्यान करित । सृष्टिरचना कार्यांत । मग्न जेव्हां ती होत । तेव्हां विविध तिथी जन्मल्या ।।३।। मुखांबुजापासून प्रतिपदा जन्मली । नासिकेपासून द्वितीया झाली । वक्षापासून तृतीया उद्भवली । अंगुलीपासून पंचमी ।।४।। हृदयापासून षष्ठी जन्मत । डोळ्यांपासून सप्तमी संजात । बाहूपासून अष्टमी उत्पन्न होत । उदरापासून नवमी तिथी ।।५।। कानांपासून दशमी जन्मली । कंठापासून एकादशी झाली । पायांपासून उद्भवली । द्वादशी तिथी दक्ष प्रजापते । ।।६।। स्तनांपासून त्रयोदशीं । अहंकारांतून चतुर्दशी । मनापासून निर्मिती अविनाशी । पौर्णिमा अमावास्या तिथींची ।।७।। जिह्वेच्या सर्व भावें प्राप्त । तिथींस भिन्नता जगांत । कृष्णा चतुर्थी जी उक्त । तिच्यापासून जन्म कृष्णतिथींचा ।।८।। शुक्ल चतुर्थीपासून । चौदा तिथ्यांचा देह समुत्पन्न । एका पक्षांत ऐशा तिथी महान । पंचदश जाणाव्या ।।९।। दिनांश पुरुष होत । रात्री

स्त्रीरुप धारण करित । स्वस्वभाव विहारज्ञ असत । हितांत रत सर्वदा ।।१०।। अन्य तिथीं सहित । चतुर्थी देवी तप करित । गणेशभजनीं नित्य रत । मंत्रध्यानपरायण ।।११।। एक वर्ष ऐसें जात । तेव्हां विघ्नेश प्रकटत । भक्तवत्सल चतुर्थीच्या पुढ्यांत । शुक्लेसमोर माध्यान्हीं ।।१२।। कृष्णेसमोर चंद्रोदयीं प्रकटत । वर मागा ऐसें म्हणत । गणेशासी त्या वंदित । पूजा करून स्तुति करिती ।।१३।। शुक्लचतुर्थी प्रथम प्रार्थित । गजानना तुझ्या भक्तींत । दृढ करावें माझें चित्त । याहून अन्य इच्छा नसे ।।१४।। तिचें तें वचन ऐकून । तिजला म्हणे गजानन । माध्यान्हीं झालें दर्शन । म्हणोनि पुण्यकाळ हा जाणावा ।।१५।। माध्यान्ह काळीं शिवादिक जे मज भजती । शुक्ल चतुर्थीस भावभक्ती । ते सर्वजन होती । प्रिय मजला जगांत ।।१६।। माझ्या समस्त व्रतांत । सर्व भावें तूं विलसत । निराहार राहून मज उपासत । चतुर्विध वैभव देईन त्यासी ।।१७।। संचित नसलें तरी होत । फलप्रद यांत संशय नसत । नाना भावें नियंत्रित । म्हणोनि वरदा नाम तुझें ।।१८।। संचित असलें वा नसलें । तरी ज्यानें गणेशा पूजिलें । चतुर्थी तिथीस भावबळें । सफल त्याचें व्रत होय ।।१९।। माझ्या कृपाप्रसादें युक्त । ऐशा तुज जे न पूजित । त्यांची अन्य व्रतें निष्फळ होत । ऐसें माहात्म्य चतुर्थी तुझें ।।२०।। ऐसे बोलून अंतर्धान । पावला देवनायक गजानन । शुक्ल चतुर्थी तेव्हांपासून । वरदा नामे ख्यात झाली ।।२१।। गणेशासी प्रिय अत्यंत । त्याची ती जन्मतिथी होत । जगीं लाभण्या आत्महित । उपोषण त्या दिनीं करावें ।।२२।। पंचमीस पारणें करून । ब्राह्मणांसी साक्ष ठेवून । करावें मनोभावें उद्यापन । तेणें चतुर्विध फल लाभे ।।२३।। जें जें इच्छी तें तें लाभत । व्रत करता समस्त ईप्सित । अन्ती स्वानंदलोकांत । ब्रह्मसायुज्य त्यास लाभे ।।२४।। ऐशा या चतुर्थी

व्रतांत । प्रिय अन्न पापी जे नर भक्षित । तरी ते नरकास पात्र होत । अन्नहीन त्यामुळे ।।२५।। ऐसा वर चतुर्थीस देत । विघ्नराज तो कृपायुक्त । त्या वेळेपासून सर्वमान्य होत । शुक्ल चतुर्थी व्रतमूल ।।२६।। नंतर कृष्ण चतुर्थीप्रत । पुनरपि प्रकटून गणेश म्हणत । आता तूं वर माग इच्छित । महाभागे मी तो देईन ।।२७।। ऐसें वचन ऐकून । प्रथम प्रणाम करून । नंतर पूजून गजानन । स्तुति करी हर्षयुक्त ।।२८।। जरी प्रसन्नभावें वर देसी । तरी तुझी दृढ भक्ति देई मजसी । महोदरा, नाथा वियोग मजसी । आपुला कधीं न व्हावा ।।२९।। सर्वमान्य मज करावें । मीं एकनिष्ठ भक्तिभावें । तिचें वचन ऐकून बरवें । बोलतसे गजानन ।।३०।। सदैव मम प्रिया अत्यंत । होशील महातिथे तूं जगांत । चंद्रोदयीं मी तुझ्या सहित । तें व्रत मुख्य जाणावें ।।३१।। माझा वियोग तुज न होईल । त्या दिनीं जे वर्जिती अन्न जल । उपासना करिती अमल । त्यांची संकटें हरण करीन ।।३२।। पांच प्रहर माझे भक्त । जे राहती अन्नजलवर्जित । दृढ श्रद्धेनें उपासना करित । त्यांचे संकट हरण करीन ।।३३।। चतुर्विध संकटे असत । जन्म मृत्यु कर्म व्रतज जगांत । त्यानें कर्मफल ना लाभत । कदापिही व्रतधाऱ्यास ।।३४।। इत्यादि विविध संकटें हरण करी । चतुर्थिके माझ्या प्रसादें उद्धरी । संकष्टीचें व्रत जो करी । भक्तियुक्त मनानें ।।३५।। इहलोकीं अखिल भोग भोगत । अन्ती स्वानंदलोकांस जात । संकटहारिणी चतुर्थी असत । तिच्या प्रभावें ऐसें घडे ।।३६।। माझे जो भजन करित । तरी चतुर्थी व्रत न आचरत । तरी तें सकल निष्फल होत । ऐसें रहस्य जाणावें ।।३७।। तुज सोडून जे पापी नर । अन्य व्रतें करिती अपार । निष्फल ती सर्व होणार । यांत संशय कांहीं नसे ।।३८।। वर्णाश्रमधर्मी असत । परी चतुर्थी व्रत न करित । त्याचे स्वधर्मस्थ कर्म नष्ट होत । इतुकें

माहात्म्य चतुर्थीचें ।।३९।। नियत चित्त निराहार युक्त । जो रात्रीपर्यंत व्रत आचरत । त्याचे संकट हरण करी त्वरित । स्वानंदार्थ नि:संशय ।।४०।। अन्य द्विजांसहित । माझें पूजन करून विधियुक्त । भोजन करावे रात्रीं समयांत । वरानने मज तोषवाया ।।४१।। श्रावणांत लाडू भक्षण करावे । भाद्रपदांत दहिभाताचें भोजन घ्यावें । अश्विनात निर्जल करावें । संकष्टीचें व्रत सदा ।।४२।। कार्तिकांत दुग्धपान करावें । मार्गशीर्षांत जल पिऊन रहावें । पौषमासीं गोमूत्र सेवन करावें । माघमासांत खावे तीळ पांढरे ।।४३।। फाल्गुनांत घृत शर्करा सेवन । चैत्रांत पंचगव्याचें प्राशन । वैशाखीं कमलबीज भक्षण । ज्येष्ठांत सेवावें गोघृत ।।४४।। आषाढांत मधु भोजन । यति जनासी हे सर्वदा बंधन । अन्यांनी करावें भोजन । ऐशा प्रकारें अन्य रीती वा ।।४५।। याम मात्र रात्र अवशेष असत । तेंव्हा प्रात:काळी उठावें भक्तियुक्त । माध्यान्ह कर्म प्रात:कालांत । करावें गणेशभक्तानें ।।४६।। चार घटका रात्रींत । सूर्योदय तो प्रकीर्तित । ऐशा रीती कर्मादिक करित । अन्य मंत्रें पूजी मज ।।४७।। प्रत्यक्ष उदय काळीं आचरावें । सूर्याचें उपस्थान बरवें । नंतर चंद्रोदयापर्यंत करावें । जपादि व्रत शमीखालीं ।।४८।। मौन ठेवून अनुष्ठान । करावें नंतर विधियुक्त स्नान । माध्यान्ह कालीं कर्म करून । विधिपूर्वक मज पूजावें ।।४९।। नंतर करावें अर्घ्यदान । प्रथम चतुर्थी तुझा मान । नंतर अर्घ्य मज निवेदन । तदनंतर सात अर्घ्य चंद्रासी ।।५०।। ब्राह्मणाचें करून पूजन । नंतर करावें भोजन । मोदक, अपूप, लाडू, खीर आदि अन्न । सेवन करावें प्रसादरूप ।।५१।। रात्रीं जागरण करावें । माझ्या कथांचे मनन करावें । पंचमी तिथीस सर्वोपचारें । पूजा करावी प्रयत्नें ।।५२।। ऐसें

व्रत जो नर आचरित । सर्वार्थ सिद्धि त्यास प्राप्त । देवांसही तो मान्य होत । अन्ती ब्रह्मांत लय पावे ।।५३।। जैसा मी देवादींत आदि पूज्य असत । तैसी तूं आदि पूज्या व्रतांत । शुक्ल, कृष्ण चतुर्थी व्रत । जे करिती ते सफळ होती ।।५४।। सर्व कार्यात सिद्धि लाभत । ऐशा त्या दृढभक्तांस जगांत । ऐसें बोलून अंतर्हित । जाहला गणेश ब्रह्मनायक ।।५५।। चतुर्थी तिथी भक्तिसंयुक्त । तेथेंचि राहिली मनन करित । हृदयीं आपुल्या आठवित । गणेशाचे बोल सुखद ।।५६।। ओमिति श्रीमदान्त्ये पुरणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते शुक्लकृष्णचतुर्थीवरदानवर्णनं नाम द्वितीयोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय दुसरा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । मुद्गल सांगती दक्षाप्रती । गणपती तदनंतर जाती । अन्य सर्व तिथींपुढती । म्हणती मागा इच्छित वर ।।१।। गणपतीचें वाक्य ऐकून । तिथी गणनायका वंदून । नंतर पूजा करून । स्तुति करिती तयाची ।।२।। गजाननासी त्या प्रार्थिती । जरी वर देसी आम्हांप्रती । तरी आमुचें कार्य या जगतीं । काय तें सांगा दयासिंधू ।।३।। आपापल्या त्या उचित कार्यांत । देवा सामर्थ्य देई अद्‌भुत । भक्ती तुझ्या पायीं अविरत । दृढतर सर्व मान्य होई ।।४।। त्यांचें तें वचन ऐकून । सर्वांसी हितकारक बोले वचन । प्रजानाथा दक्षा तैं गजानन । तेव्हा सांगता जाहला ।।५।। माझी भक्ति अत्यंत । राहील तुमच्या चित्तांत । तुम्ही महाभागा पुण्यभागा ख्यात । तिथीनों या जगांत ।।६।। माझ्या कलांशांतून जन्म पावले । त्यांसी तुम्हीं पाहिजे तोषविलें । तुमच्यासहित देव भले । जनांस प्रीतिप्रद होवोत ।।७।। जे नर प्रतिपदा दिनीं पूजतील । हुतद्रव्यें

अग्नीस अमल । दुग्धाहार राहतील । व्रतामध्यें रत सर्वदा ।।८।। उपोषण करून देवांसी आराधती । त्यासी देव ईप्सित देती । ते मरणानंतर उपभोगिती । विविध भोग अग्निलोकांत ।।९।। अग्नितुल्य प्रकाशयुक्त । ऐशा विमानांतून गगनीं संचरत । यांत संदेह अल्प नसत । प्रतिपदेचें हें व्रत करणारे ।।१०।। ब्रह्मार्पण स्वभावें माझ्यांत । अन्तीं ते एकरूप होत । द्वितीयेस अश्विनांत पूजित । पत्राहार समायुक्त ।।११।। ते रूपसंपन्न होती । येथ अखिल भोग भोगिती । अन्ती सलोकता लाभती । देवमान्य होऊनिया ।।१२।। ब्रह्मार्पण स्वभावें द्वितीयेचें व्रत । जे करती माझे भक्त । ते माझ्या स्वानंदांत । लीन होतील निश्चयें ।।१३।। तृतीयेस महाशक्ति पूजिती । लवण आहार वर्जिती । सर्व सौभाग्यद्रव्यें उपासिती । भक्तिपूर्वक जे जन ।।१४।। ते शक्तिलोकांत जाऊन । अनन्त भोग भोगून । ब्रह्मार्पण तेणें अन्ती लीन । माझ्या लोकांत होतील ।।१५।। पंचमीस नागमुख्यासी पूजित । दुधाचें स्नान त्यास घालित । आम्ल पदार्थ भोजन वर्जित । नागलोकांत तो जाई ।।१६।। तेथ नाना भोग भोगून । अन्तीं निष्काम होऊन । माझ्या लोकीं आगमन । करील तो निश्चयें ।।१७।। षष्ठी तिथीस स्कंदासी पूजित । फलाहार जो त्या दिनीं करित । तो महाभोग भोगित । कार्तिकेयाच्या लोकांत ।।१८।। निष्काम भाव होऊन । अन्तीं स्वानंदांत गमन । सर्व भावांचें नियमन करून । शुक्ल गतीनें क्रमें जातो ।।१९।। सप्तमीस उपोषण करून । सूर्याचें करी पूजन । तो सूर्यलोकीं जाऊन । प्रचुर भोग भोगी ।।२०।। अन्तीं निष्काम व्रतानें प्रवेशत । महालय समयीं स्वानंदांत । होऊन सदेह ब्रह्मभूत । अद्वैत माझें लाभेल ।।२१।। अष्टमीस मातृकांचें पूजन । बिल्व आहारमय अन्न सेवून । करी जो भक्तिपूर्ण मन । मातृलोकांत जाईल तो ।।२२।। मदर्पण स्वभावें व्रत परायण असत । तोही माझ्या

लोकीं येत । नवमीस दुर्गेचें पूजन करित । पीठ खाऊन जो नर ।।२३।। तो दुर्गा लोकांत भोगत । दिव्य भोग समस्त । ब्रह्मार्पण स्वभावें प्रवेशत । माझ्या लोकीं शुक्ल गतींनें ।।२४।। दशमीस दिशा प्रमुखांसी पूजित । व्रतसंस्थ जो दधि भक्षण करित । तो इहलोकीं भोगून भोग समस्त । अंतीं दिगीश लोक लाभेल ।।२५।। तोही निष्कामभावें ब्रह्मभूत । पावतो माझे अद्वैत । एकादशीस कुबेरा पूजित । वह्नीनें पक्व अन्न वर्जून ।।२६।। तोही आपुल्या भक्तियोगें लाभत । नाना भोग कुबेर लोकांत । ब्रह्मार्पण स्वभावें करितां हें व्रत । सुखी सदैव होईल ।।२७।। द्वादशीस विष्णूस पूजित । घृत भोजन सेवन करीत । तो वैकुंठ लोकीं जात । नाना भोग परायण ।।२८।। परी ब्रह्मार्पण स्वभावें जो हें व्रत । माझ्या महालयसमयीं करित । तो माझ्या लोकीं प्रवेशत । अन्तीं ब्रह्ममय होतसे ।।२९।। त्रयोदशीस धर्मासी पूजित । क्षीर भोजन सेवन करित । तो जाऊन धर्मलोकांत । विविध सुखें भोगत ।।३०।। ब्रह्मार्पण स्वभावें त्रयोदशी साधित । तो स्वानंदीं प्रवेशत । अन्तीं ब्रह्मभूत होत । ऐसें माहात्म्य या व्रताचें ।।३१।। चतुर्दशीस करी शिवपूजन । भक्तियुक्त ठेवोनियां मन । उपोषण त्या दिनीं करून । गोधूम अन्नानें पारणा करी ।।३२।। ऐसें जो व्रत करित । तो कैलासलोकीं जात । निष्कामचित्त जरी असत । तरी अन्तीं मन्मय होई ।।३३।। पौर्णिमेस चंद्रादि देवांसी पूजित । देवगणांसी जो आराधित । तो चंद्रलोकीं प्रवेशत । अखिल भोग येथ भोगून ।।३४।। जरी तो निष्काम चित्त असत । तरी अन्तीं ब्रह्ममय होत । उपोषण समायुक्त । अर्घ्यदान चंद्रासी करी ।।३५।। रात्रीं एकदा भोजन करी । सर्व देवांची पूजा करी । पौर्णिमा ही चेतोहारी । सर्व देवमयी चांद्री ।।३६।। ऐसी ही पुण्यप्रद तिथि ख्यात । आतां ऐका अमावास्येचें व्रत । पितृपरायण तर्पण करित । त्या दिनीं

जो भक्तिभावें ।।३७।। तो संतोषवी पितरांस । करूनिया उपोषणास । लाभतो सर्वार्थ त्यास । अन्तीं प्रवेशत पितृलोकीं ।।३८।। परी होता निष्कामचित्त । अन्तीं लय पावे स्वानंदांत । ऐशा शुक्ल कृष्णा तिथी असत । सदा पूजनीय व्रतकर्त्यासी ।।३९।। ऐशी भावबळें पूजा करित । तो सर्व अर्थकाम लाभत । माझ्या प्रियतिथी ह्या समस्त । प्रभाव त्यावरी देवांचा ।।४०।। जे देव माझ्या कलांशांनी संयुक्त । म्हणोनि असती बलवंत । जे चतुर्थी व्रत न करित । त्यांचे निरर्थक सर्व कार्य ।।४१।। म्हणून चतुर्थी संयुक्त । तुम्ही मानार्ह समस्त । काल मानें पूजनीय जगांत । ऐसे सांगे गणवल्लभ ।।४२।। नंतर गणेश अन्तर्धान पावत । तेव्हांपासून तिथियुक्त व्रत । दक्षा जाहलें प्रख्यात । गणेश महिमा प्रवर्तक ।।४३।। चतुर्थीचें महिमान । तैसेचि हे अन्य तिथींचें पावन । ऐकेल अथवा वाचील प्रसन्न । तो नर सर्वार्थ मिळवील ।।४४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खण्डे गजाननचरिते प्रतिपदादितिथीयुक्तव्रतवर्णनं नाम तृतीयोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तिसरा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । मुद्गल म्हणती दक्षासी । आता पुरातन संवाद सांगेन तुजसी । ज्यांत दशरथ राजासी । वसिष्ठांनीं उपदेश केला ।।१।। तो ऐकतां चतुर्थीचें महिमान । दशरथासी समजलें प्रसन्न । ब्रह्मपुत्रा तूही होशिल पावन । चतुर्थी माहात्म्य तें ऐकतां ।।२।। महायश दशरथास नव्हतें संतान । वंध्यादोषानें मन त्याचें खिन्न । वसिष्ठांसी शरण जाऊन । प्रणाम करूनी विचारी तया ।।३।। महामुने पुत्रप्राप्ती होण्यासी । उपाय सांगावा मजसी । आपल्या विनम्र शिष्यासी । तारावें या भवसागरीं

।।४।। तें ऐकून वसिष्ठ सांगत । दशरथा, नृपोत्तमा स्वीकारी व्रत । कुलदेव गणेशाचे तूं भक्तियुक्त । तेणे मनोरथ सफल होईल ।।५।। वसिष्ठांचें वचन ऐकून । पुन्हा त्यासी प्रणाम करून । दशरथ विचारी विनयसंपन्न । कोणतें हें व्रत सांगा ।।६।। गणेशाचें हें व्रत । पूर्वी कोणी केलें जगांत । त्यापासून सिद्धि काय मिळत । कोणत्या वेळीं हें करावें? ।।७।। कोणता पूजन विधि असत । तें सर्व विस्तारें सांगा मजप्रत । मी आपुल्या वचनांकित । करीन आज्ञेनुसार तुमच्या ।।८।। वसिष्ठ तेव्हां दशरथासी म्हणती । धन्य धन्य तुझी मती । गणेश व्रतावरी तुझी भक्ती । दाखविलीस या योगें ।।९।। चतुर्थी तिथी प्रिय अत्यंत । नृपोत्तमा गणनाथाप्रत । शुक्ल कृष्ण नामें जगांत । सर्वसिद्धिप्रद सर्वदा ।।१०।। चंद्राचा उदय होत । तेव्हां जी कृष्णा चतुर्थी येत । ती संकटहारिणी विख्यात । चतुर्विध फलप्रद ।।११।। चतुर्विध हें जग समस्त । तेथ संकटें तैशीच येत । परी तीं सर्व दूर होऊन भोगित । इहलोकीं अखिल भोग ।।१२।। जरी चंद्रोदयी चतुर्थी न लागत । तरी प्रदोष व्यापिनी ग्राह्य होत । सर्व संकटांपासून मुक्त । हे व्रत करिता भक्त होय ।।१३।। जरी उभय दिनीं चतुर्थी असत । तरी चंद्र संयुक्त आचरावी उपवासयुक्त । स्वेच्छाविहारें करिती भक्त । ऐसा क्रम कथिला असे ।।१४।। तृतीयेस प्रदोष असत । त्या रात्रीं चंद्रोदया चतुर्थी येत । तरी तीच ग्राह्य सदा होत । अन्य दिवस सोडोनिया ।।१५।। शुक्ल कृष्ण चतुर्थीत । शुक्ला वरदा नामें ख्यात । व्रतकारी जनासी लाभत । संचित असंचित सर्व लाभ ।।१६।। धर्म अर्थ काम मोक्ष हे चार । पुरुषार्थ प्राप्त करी नर । गणेशासी प्रीतिकर । म्हणोनि ही वरदा चतुर्थी ।।१७।। माध्याह्नव्यापिनी ग्राह्य होत । शुक्ल चतुर्थी ऐसा संकेत । उभयत्र जेव्हां लाभत । तेव्हां प्रहर भानुगा उपासावी ।।१८।।

एक प्रहरानंतर होत । जरी तृतीया सूर्य संयुत । तरी पूर्वा असो परा वा उभयतांत । व्रतसंमत चतुर्थी ती मान्य असे ।।१९।। जो असे चतुर्थी व्रतहीन । त्याची अन्य समस्त व्रतें फलहीन । म्हणोनि निष्ठा ठेवून । चतुर्थी व्रत आचरावें ।।२०।। हें व्रत महाभागा आचरिलें । ब्रह्मदेवानें पूर्वी भलें । या व्रताच्या प्रभावे निर्मिलें । सकळ जग विधात्यानें ।।२१।। ऐसें हें उत्तम व्रत । विष्णु शंकरही आचरित । त्यायोगें स्थिति संहार करित । अनुक्रमें ते दोघे ।।२२।। शुक मुख्य कश्यपादि मुनीश्वर । ऐसे योगीजन उदार । चतुर्थीचे हें व्रत पवित्र । स्वकार्यसिद्धीस्तव करिती ।।२३।। इहलोकीं अखिल भोग भोगून । अन्तीं स्वानंदलोकीं करिती गमन । अन्य ऐसे पुरुषार्थ साधन । चतुर्थीसम जगांत नसे ।।२४।। वर्णाश्रमसंस्थित अन्य नारी नर बहुत । जे चतुर्थीचें व्रत आचरित । ते ते सर्व ब्रह्मभूत । होऊन पावले स्वानंदपुरासी ।।२५।। ऐसे हें व्रत भावसंयुक्त । दशरथा करी तूं एकचित्त । तरी पुत्रलाभ होऊन निश्चित । स्वानंदलोकीं जाशील ।।२६।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खण्डे गजाननचरिते दशरथव्रतोपदेशो नाम चतुर्थोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चौथा संपूर्ण)

श्रीगणेशाय नमः । दशरथ म्हणे वसिष्ठासी । चतुर्थी व्रत माहात्म्य मजसी । सांगावें जें हितकारक जगासी । गणनाथप्रिय सविस्तारें । ।।१।। ब्रह्मादींनीं केलें व्रत । त्याचा सांगावा वृत्तांत । दक्षही मुद्गलासी प्रार्थित । सांगावें माहात्म्य चतुर्थीचें ।।२।। महारम्य कथा ऐकिली । परी माझी तृप्ति न झाली । आपण पाहिजे कृपा केली । कथा आणखी सांगूनी ।।३।। दक्षाचें भक्ति संयुक्त वचन । ऐकून सांगती मुद्गल प्रसन्न ।

सूत सांगती तें आठवून । शौनकासी तदनंतर ।।४।। दशरथाचें वचन ऐकून । वसिष्ठ सांगती पुरातन । वृत्तान्त घडला जो महान । प्रलयकाळीं एकदा ।।५।। त्या वेळीं स्थावर जंगम नष्ट होत । पंचभूतमय जें जें जगांत । तीन अवस्थांनीं युक्त । शून्यवत् झालें सर्व कांहीं ।।६।। सर्व ब्रह्ममय होत । तीच योगनिद्रा गणेशाची ख्यात । वेदांतात वर्णिली असे साद्यंत । ऐसा कांहीं काळ गेला ।।७।। नंतर गणेशासी जागविती वेदपारंगत । तेव्हां पुन्हां तो सर्व निर्मित । तत्त्वधारक क्रीडा करीत । सृष्टीरचनेची त्यावेळीं ।।८।। सत्त्व, रज, तम या त्रिगुणांपासून । पांच देव झाले उत्पन्न । ब्रह्मा विष्णु शिव शक्ति संपन्न । सर्वधारक सूर्यदेवही ।।९।। त्यांनी तप आचरिलें घोर । एकाक्षर विधानें अति उग्र । तेव्हां गणनाथ चेतोहर । प्रसन्न जाहला तयांवरी ।।१०।। त्यांना आत्मरूप दाखवित । सर्वप्रद परमश्रेष्ठ जें जगांत । त्या योगें जाहलें हृदयांत । ज्ञानयुक्त पंच देव ।।११।। नरेश्वरा, दशरथा ते प्रार्थिती । सर्व देव, योगी भृशुंडीप्रती । त्यांच्या आज्ञेनुसार जाती । आपापल्या नगरांत ।।१२।। नंतर कर्मभूमीत स्थापित । गणेशाचें क्षेत्र पुनीत । स्वानंद नामक विख्यात । जैसें वेदांत कथिलें असे ।।१३।। तेथ विघ्नपाची मूर्ति । जेव्हां सर्व देव तैं आदरें स्थापिती । भाद्रपद शुक्ल चतुर्थी ती होती । माध्यान्हीचा समय होता ।।१४।। नंतर ते सर्व देव आराधिती । गणराजासी अति प्रीती । माघ शुक्ल चतुर्थीस प्रकटती । वरद गजानन त्यांच्यापुढें ।।१५।। त्याच्या वरप्रसादें जग निर्मित । म्हणोनि या तिथीस वरदायिनी म्हणत । ब्रह्मादिक सर्वांसी उपदेशित । चतुर्थीचें व्रत तदा ।।१६।। ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी ही असत । गणेशव्रतार्थ प्रख्यात । ज्येष्ठी माघी, भाद्रिका लाभत । शुक्ल चतुर्थी मुख्यत्वें ।।१७।। तथापि भाद्रपद मासांत । महामते शुक्लपक्षीं जी येत । ती मुख्यत्व पावत । या तीन

चतुर्थ्यांमध्यें ।।१८।। चतुर्थीसम अन्य नसत । व्रत महत्त्वपूर्ण जगांत। काय वर्णन करावें समुचित । त्यासम तीच असे ।।१९।। भाद्रपद शुक्ल चतुर्थीव्रत । जो नर भक्तिभावें आचरित । त्यास बारा चतुर्थ्यांचें पुण्य लाभत । ऐसें गणेशयोगी सांगती ।।२०।। जरी अंगारकी चतुर्थी करित । तरी सोळा चतुर्थ्यांचें पुण्य लाभत । ती चतुर्थी चंद्रयुक्त । तर चोवीस चतुर्थ्यांचे फल लाभे ।।२१।। स्वाती नक्षत्र युक्त । चतुर्थी असेल सोमवारयुत। चोवीस चतुर्थ्यांचें फळ लाभत । पुण्यकारक गणेशभक्ता ।।२२।। माघ शुक्ल चतुर्थीव्रत । जो कोणी भक्तिभावें आचरित । त्यास आठ चतुर्थ्यांचें फल लाभत। ऐसें ग्रंथीं सांगितलें ।।२३।। जरी अंगारक चतुर्थी व्रत साधित । तरी बारा चतुर्थ्यांचे पुण्य लाभत । ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी जो करित। त्यास चार चतुर्थ्यां पुण्य लाभे ।।२४।। अंगारक युक्त चतुर्थी करित । तरी द्वादश चतुर्थ्यांचें फळ लाभत । म्हणौनि प्रयत्नपूर्वक जगांत । सर्वदायिका ती आचरावी ।।२५।। श्रावणादि अन्य मासांत । वरदा चतुर्थी शास्त्रसंमत । धर्म, अर्थ, काम, मोक्ष देत । ऐसा महिमा वर्णिला असे ।।२६।। श्रावणमासीं जी चतुर्थी येत । ती दोन चतुर्थ्यांचें पुण्य देत। चतुर्थीचा महिमा अनंत । कोण वर्णू शकेल? ।।२७।। आतां राजेंद्रा तुज सांगतों । जो नर कृष्ण चतुर्थी करितो । तो जें जें इच्छिल तें प्राप्त करितो । पुण्य बहुविध शुभप्रद ।।२८।। सर्व प्राणिमात्रांवर येत । चतुर्विध संकटें जगांत । जन्म मृत्यु तीन अवस्था योगें युक्त । कर्मज फळानें चवथें तें ।।२९।। ऐसे बहुविध भेद असत । त्यांचे वर्णन अशक्य असत । चतुर्विध जग समस्त । पांचवें ब्रह्म ख्यात असे ।।३०।।

कृष्ण चतुर्थी विनाश करीत । चार चतुर्विध संकटांचे जगांत । म्हणोनि तिज संकष्टी म्हणत । कृष्ण पक्षांतील जी चतुर्थी ।।३१।। तिचाही महिमा अनुपम । वर्णन करण्या कोण क्षम । सर्व सिद्धिप्रद क्षेम । उपासकांचें जी करी ।।३२।। माघ कृष्ण चतुर्थीचें व्रत । ब्रह्मदेव पूर्वी आचरित । आठ चतुर्थ्यांचें पुण्य लाभत । विश्वयोनीस जैसे लाभलें ।।३३।। जरी माघी अंगारकी असत । कृष्ण चतुर्थी विशेषयुक्त । वीस चतुर्थ्यांचें फळ लाभत । मंगळवारी व्रत आचरितां ।।३४।। श्रावण कृष्ण चतुर्थी करितां । चार चतुर्थ्यांची सांगता । लाभते यांत चित्ता । संशय अल्पही नरें न धरावा ।।३५।। देव मुनींद्रासी उपदेशिली । ऐसी सर्व संकटहारिणीं जी शोभली । भाद्रपद कृष्ण चतुर्थीही भली । चार चतुर्थ्यांसम असे ।।३६।। ही चतुर्थी करून देवांप्रत । गणनाथ वरप्रद होत । म्हणोनि ती मुख्यत्व लाभत। यांत संशय कांही नसें ।।३७।। जरी ती मंगळवारी येत । तरी बारा चतुर्थ्यांचें पुण्य देत । शुक्ल कृष्णा चतुर्थ्यां सतत । भक्तिभावें कराव्या ।।३८।। चार पुरुषार्थ सिद्ध होती । चतुर्थी व्रत करिता जगतीं । अन्यथा सर्व व्रतें सिद्धिहीन होती । ऐसें माहात्म्य चतुर्थी व्रताचें ।।३९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खण्डे गजाननचरिते चतुर्थीविवेकवर्णनं नाम पंचमोऽध्यायः समाप्तः। श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पांचवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ वसिष्ठासी विचारित । अंगारकयुता श्रेष्ठ कां होत । तें सांगावें स्वामी मजप्रत । संशय माझ्या मनीं असे ।।१।। वसिष्ठ तेव्हां कथा सांगती । अतिरोचक जी तयाप्रती । पृथ्वी

आणि भरद्वाजापासून जगतीं । जन्म झाला भौमाचा ।।२।। तो मंगळ महामती आचरित । गणेशव्रत श्रद्धायुक्त । गणानां त्वा या मंत्रे पूजित। विघ्नपासी भक्तीनें ।।३।। गजानन देवासि ध्यात । रम्य तपश्चर्या तो करित । पारिनेर नगराच्या पश्चिमेत । वनांत एका राहून ।।४।। ऐसी शंभर वर्षें जात । तेव्हां गणाध्यक्ष प्रसन्न होत । वर माग महाभाग म्हणत । तेव्हां भूमिसुत पूजी तया ।।५।। भक्तिभावें करी स्तवन । नंतर भौम म्हणे वचन । मी नरदेहयुक्त सामान्यजन । अमृत ग्रह मज करावें ।।६।। तुझ्या भक्तीचें एक निलय । मंगल नामें सुखकर अभय । ऋणहर्ता धनप्रद आनंदमय । करी मजला वरदा कृपाळा ।।७।। माघकृष्ण चतुर्थीदिनी । मजला तव दर्शन लाभोनी । धन्य झालों जीवनीं । म्हणोनि महापुण्यदाती तिथी होवो ।।८।। तथास्तु गणनाथ म्हणत । भौम मंगल नामें ख्यात । अभीष्ट सर्वही लाभत । अंगारकी चतुर्थी मुख्य झाली ।।९।। जेव्हां भाद्रपद शुक्ल चतुर्थी असत । तेव्हां चंद्रदर्शन कां वर्ज्य असत । त्याचा इतिहास तुजप्रत । विशेषयुक्त सांगतों आतां ।।१०।। हा इतिहास ऐकतां दोषहीन । होशील तूं नृपा महान । गणेश भजनीं निमग्न । भजशील दशरथा त्यास सर्वदा ।।११।। एकदा देवांसहित मुनिजन । निश्चय करिती मिळून । गणेशांशसमुत्पन्न । पांच देव मुख्य असती ।।१२।। ते गणेशस्वरूपाहून । कदापिही नसती भिन्न । त्यांच्या स्मरणमात्रें होत प्रसन्न । गणनायक गजानन ।।१३।। म्हणोनी मुनीश्वर पूजिती । शिवादि देवांसी जगतीं । ऐसें अन्य देवही आचरती । ज्ञानगर्वे सहर्ष ।।१४।। विष्णु मुख्यांनी प्रतिपादिलें । तें सर्व तैसेंचि भलें । मुनिगण त्या रीतीं करून झालें । सिद्धिविहीन भ्रान्त सारे ।।१५।। देवगणांसह नंतर जाती । ते ब्रह्मदेवांप्रती । त्याची स्तुति करून सांगती । वृत्तान्त सारा अद्भुत ।।१६।। तो ऐकतां ब्रह्मा सुविस्मित । चिंतातुर

जाहला मनांत । विष्णु शिव अर्यमा शक्तीही होत । आश्चर्यचकित तें ऐकून ।।१७।। इतुक्या माजीं तेथ उठत । ध्वनि भयंकर तीव्र घोषयुक्त। प्रलयसूचक तो ऐकून होत । भयोद्विग्न देव शंभु मुख्य ।।१८।। नंतर महाभीम पुरुष अकस्मात । त्यांच्या पुढे प्रकटत । विक्राळ त्यास पाहून मूर्च्छित । शंकरादि देव झाले ।।१९।। मुनि देवता कित्येक पळती । कोणी बेशुद्ध होती । मुहुर्तमात्रें सावध होती । ब्रह्मादिक सुर जेव्हां ।।२०।। तेव्हां पाहती पुढ्यांत । गणनायकासी साक्षात । अतिभयसंयुक्त त्यास स्तवित । हृदयीं ध्याऊन गजवक्त्र ।।२१।। गणनाथासी विघ्नपतीसी । अनाथांच्या सुनाथासी । विघ्ननिवारणासी निराकारासी। हेरंबा तुज नमन असो ।।२२।। भक्तांसी सर्वदात्यासी। साक्षीसी अमेय अप्रतर्क्यासी । गजाननासी देवासी । शूर्पकर्णा तुज नमन असो ।।२३।। महोदरासी सर्वादि पूज्यासी । सर्वादींसी महादात्यासी । सर्व पूज्यासी ढुंढिराजासी । सर्व भावस्थिता नमो नमः ।।२४।। स्वानंद निवासासी। योग शांतिमयासी । योग्यासी योगदात्यासी । योगपतीसी नमो नमः ।।२५।। सृष्टिकर्त्यासी सुपुत्रासी। सृष्टिहर्त्या गणेशासी । गुणचालकासी अनात्म्यासी । आत्म्यासी तुज नमो नमः ।।२६।। कारणप्रकाशासी ब्रह्मेशासी । सदानाथासी देवपालकासी । निवारण करी महाविघ्नासी। नमन तुजसी पुनःपुन्हा ।।२७।। हें महाविघ्न सहसा आलें । ग्रासील आम्हां भय वाटलें । जीवित्वही संशयी पडलें । तुला शरण सांप्रत ।।२८।। तुझ्या पादपद्माचे दास । गजानना आम्हीं उदास । जरी विनाश पावलों या वेळेस । तुझें यश नाथा नष्ट होय ।।२९।। आतां देवेशा रक्षण करी । तुझें हें उग्ररूप दूर करी । पाहण्या शक्ति नसे शरीरीं। विघ्नेशा रक्षण करी तूं ।।३०।। ऐसी स्तुति ते करित । तेव्हां त्यांच्यापुढें प्रकटत । उग्ररूप सोडून गणेश रूपांत । सर्वांसी आनंद तैं झाला

।।३१।। ते सारे प्रणाम करिती । अत्यादरें पूजिती । शिवादिक त्यासी अर्पिती । आपापली मानसकन्या ।।३२।। ब्रह्मा सरस्वतीसी देत । विष्णु पुष्टीसी अर्पित । शंकर योगिनीसी समर्पित । मोहिनीस जगदंबिका ।।३३।। भानू संजीवनीस देत । सर्व प्रियंकर तो जगांत । ऐसें ते पंचदेव विघ्नेशा पूजित । मानस सुता समर्पूनी ।।३४।। दशरथा, त्या प्रणतांसी उठवून । विघ्नेश बोलें भक्तिप्रसन्न । मेघासम गंभीर स्वन । विष्णु मुख्य महेशांसी ।।३५।। शंभुमुख्य देवेंद्रांनो ऐका वचन । माझे अंश तुम्ही महान । वृथा गर्व करून मन । दूषवूं नका आपुलें ।।३६।। चराचर हें माझ्या अंशें युक्त । कांहीं नसे माझ्या विरहित । त्या सर्वांसी सिद्धि देण्या जगांत । देहधारी मी होतों ।।३७।। जरी ज्ञानानें मज न जाणत। केवळ तृणरूपी पूजित। तरी महादेवांनो मजप्रत । ती पूजा कैसी पोहोचेल? ।।३८।। तेथही माझा तृणांत । अल्पांश जरी वर्तत। तरी त्याच्या पूजेनें पूर्ण तृप्त । मी कैसाही होईन ।।३९।। आपण कलांश माझे जगांत । जे पूजिती विप्र समस्त । त्यानें गुणात्मक तृप्ती होत । केवळ कलांशरूप माझी ।।४०।। ब्रह्माण्ड संपूर्ण कोणी पूजित । तरीहीं माझी पूर्ण तृप्ति न होत । माझ्या रोमरोमांत । अनंत ब्रह्माण्डें विलसतीं ।।४१।। गजमुखादि चिन्हांनी युक्त । महेश्वर मी जगत्ब्रह्ममय वसत । योगशांतिद जगांत । त्याच्या पूजेनें सुपूजा ।।४२।। जगताचें ब्रह्माचें । पूजन एकत्र करितां साचें । तेंच पूजन पूर्णत्वाचें । तीच माझी पूर्ण पूजा ।।४३।। मज त्यागून मुनिजन । सर्वादौ करिती मोहमुग्ध मन । ज्ञानमोहांत पडून । पूजन तुम्हां पंचदेवांचें ।।४४।। आपणही मदसंयुक्त । तैसेचि झालात ज्ञानमोहित । म्हणोनी सिद्धिहीनता प्राप्त । ऐसें पुन्हा करूं नका ।।४५।। पूर्वीं भक्तिसंयुत । पूजन तुम्हीं केलेंत । तें आठवून सहन करित । अपराध तुमचा या वेळीं ।।४६।। दर्शन दिधलें तुम्हांप्रत ।

कलांशमात्रें जरी पूर्ण तुष्ट जगांत । होतों तरी देहधारी होत । मी स्वयं कां सांगावें ।।४७।। ऐसें बोलून विराम पावत । गणाधीश तैं ते प्रणाम करित । स्वदोषाची क्षमा मागत । तेव्हां काय घडलें तें ऐका ।।४८।। त्या समयीं शंकराच्या भाळीं विलसत । चंद्र दात काढून हसत । गणेशाचें रूप पाहून अविनीत । रूपगर्वें आपुल्या ।।४९।। अत्यंत मोहित होऊन । गणनायका प्रणाम करून । म्हणें हे विचित्र गजवक्त्र कां धरलें महान । पुन:पुन्हा हंसे ऐसे म्हणत ।।५०।। तेव्हां गजानन कुपित । शशलांछना चंद्रास शाप देत । जे तुज चंद्रा पाहत । ते होवोत पापी जन ।।५१।। ते सदैव विघ्नसंयुक्त । माझ्या शापानुसार होत । यांत संशय तिळ ना असत । ऐसें बोलून हो अन्तर्धान ।।५२।। आपुल्या भार्यांसहित । गणेश ब्रह्मनायक अदृश्य होत । चंद्र नंतर मलिन पडत । शंभु आदि देव गर्वहीन ।।५३।। तेव्हांपासून ते गाणपत्य होत । ब्रह्मदेवाच्या हृदयीं संस्थित। परि वेदज्ञा अहंकृति मदयुत । ब्रह्मा तेणें पुन: पुन: ।।५४।। त्यानें सरस्वती गणेशास दिली । तिच्यासह वसती केली । ब्रह्मदेवाच्या हृदयीं भली । विघ्नपानें सर्वकाळ ।।५५।। हृदयांत गणेश राहत । तरी नंतर कैसा मोहयुक्त होत । सदा त्या गणेशासी भजत । गाणपत्य भावें भक्तीने ।।५६।। सर्वाची पोषणता निवसत । तैसीच विष्णूच्या हृदयांत । त्या सामर्थ्यें केशवासी होत । मोहजन्य गर्व सदा ।।५७।। ती विश्वपोषिणी पुष्टी देत । विष्णु जेव्हां विघ्नराजाप्रत । तिच्यासह गणेशान विराजत। विष्णूच्या हृदयीं सर्वदा ।।५८।। तोही गाणपत्य विचार निमग्न । नित्य करी गणेश भजन । हृदयांत असतां गजानन। मोह त्या कैसा होणार ।।५९।। योगानें मोहहीनत्व असत । सदा शंभूच्या हृदयांत । त्या अहंकार भावें मानित । आपणांसी शंकर श्रेष्ठ पूर्वी ।।६०।। परी ती योगिनी जेव्हां देत । शिवप्रभु गणेशाप्रत । तेव्हां रमे तिच्यासवें हृदयांत।

शंभूच्या तो सर्वदा ।।६१।। गणेश हृदयांत स्थित । म्हणोनी मोह त्या न होत । सदा गाणेशक होऊन भजत । गणनायका तो विनम्र ।।६२।। वृष्टीनें दानप्रदान । करी दिवाकर तो महान । सर्वांच्या जीवनाचें धारण। ऐसें महाकर्म करी ।।६३।। अहंस्वभावें तो वर्तत । संजीवन शक्ति अन्त:करणांत । परी ती देतां विघ्नेश्वराप्रत । तिच्यासह राहे गणाधीश ।।६४।। गणाधीश हृदयांत वसत । म्हणोनी राही गणेशभक्त । अनन्यभावें त्यास भजत । मोहास नसे संधि तेथें ।।६५।। शक्ति सर्वमोहिनी देवी हृदयांत । होती ती अहंकारकारण निश्चित । ती विघ्नेश्वरा देतां तो राहत । शक्तियुक्त देवी हृदयांत तैं ।।६६।। शक्तियुक्त गणेश स्थित । जेव्हां देवीच्या हृदयांत। त्यायोगें गणेश भक्तिरत । क्रीडा करी ती देवी ।।६७।। ऐशा रीती अहंकार निर्मुक्त । देवेंद्र जाहले समस्त। गाणपत्यप्रिय होऊन भजत । विघ्ननायका सर्वदा ।।६८।। चिंतामणी चित्तांत राहून । प्रकृतिद्वारा क्रीडामग्न । मिथ्या अहंकारभावें बंधन । प्राप्त होतें जगतांत ।।६९।। कर्ता करविता गणेश असत । यात संशय लवमात्र नसत । हृदिस्थ सारें त्यास अर्पित । त्यानें सुखी पंच देव ।।७०।। तें ऐकून दशरथराजा विचारित । त्या चंद्राची काय गति होत । तें सांगावें मजप्रत । मुद्गल दक्षा ती कथा सांगती ।।७१।। वसिष्ठ म्हणती नृपाप्रत । गणेशशाप संयुक्त । चंद्र तैं परतला स्वगृहाप्रत । दु:ख अत्यंत मानसीं त्याच्या ।।७२।। एकांतात बसून । विचार करी उन्मन । गणपतीचा देह महान । संप्रज्ञान स्वरूपमय ।।७३।। असंप्रज्ञातरूप त्याचें शिर । त्यांच्या योगें प्रकट उदार । गणेश हा भक्तानुग्रहकर । देहधारी स्वयं जगीं ।।७४।। वेदांत जें कथिलें रूप अद्भुत । परमयोगप्रद पुनीत । तें न जाणिलें मी मोहयुक्त । गजानना क्षमा करी ।७५।। चित्तग अपराधाची क्षमा करी । मज दीनातें उद्धरी ।

ऐसी विज्ञप्ती चंद्र करी । विघ्नेशाच्या ध्यानीं लीन ।।७६।। गंगा तीरावरी बैसून । तप करी तो उत्तमोत्तम । अष्टादश अक्षरमंत्रें जपून । विघ्नपाचें तप करी ।।७७।। चंद्र लीन होतां जग समस्त । दुःखपूर्ण तै होत । सूर्याच्या तेजें दग्ध रसहीन वर्तत । चराचर हें उद्विग्न ।।७८।। तेव्हां देवगण सारे भयभीत । शंभु विष्णु मुख्य तप करित । षडक्षरविधानें हृदयांत । ध्यान करिती गजाननाचें ।।७९।। भक्तियुक्त ते महेश्वर तोषविती । ऐसी शंभर वर्षे जाती । तेव्हां गणाधिप प्रकटती । चंद्रापुढतीं वरदानार्थ ।।८०।। तोवरी देवेशांचें तप होत । एक वर्षभर सतत । एकाच वेळीं उभय स्तवित । देवेश आणि चंद्र तैं ।।८१।। अथर्वशीर्ष जपून तोषवित । आदरें ते ढुंढीस विनीत । संतुष्ट होऊन तैं म्हणत । ब्रह्मनायक गणेश त्यांना ।।८२।। देवेशांनो मागा सत्वर । सफळ करीन मनोरथ सर्व । गणेशवचन हें ऐकून सुंदर । हात जोडती देव सारे ।।८३।। प्रणाम करून स्तवन करिती । नम्रपणें त्यास म्हणती । जरी प्रसन्न तूं आम्हाप्रती । वरद तूं गजानन ।।८४।। चंद्रासी करी दोषमुक्त । नाथा तुज आम्हीं नमित । तेव्हां त्यासी गजानन सांगत । भक्तीनें संतुष्ट मीं तुमच्या ।।८५।। चंद्रास जो पूर्वी शाप दिला । त्यास उःशाप देतों या वेळा । भाद्रपद शुक्ल चतुर्थीला । न घ्यावें चंद्रदर्शन कोणी ।।८६।। त्या दिवशीं हसला मजला । त्या दोषें अपराधी झाला । म्हणोनी त्या दिनीं तयाला । पाहूं नये कोणी जगीं ।।८७।। अन्य दिनीं त्याचें दर्शन। घेतलें तरी दोषहीन जन । ऐसें वरदान देऊन । गणेश अन्तर्धान पावला ।।८८।। देव जाहले अति हर्षित । चंद्रासी तें सांगण्या जात । तेथ चंद्राच्या पुढ्यांत । गणपति तै प्रकटला ।।८९।। त्या पाहून करी नमन। घाली साष्टांग नमस्कार प्रसन्न । विधियुक्त पूजा करून । कृतांजली स्तवन करी ।।९०।। विघ्नपालासी गणेशासी । परमात्म्यासी

ब्रह्मेशासी । स्वभक्तां ब्रह्मभूयप्रदासी । अनामयासी नमन असो ।।९१।। सर्वादिपूज्यासी शिवात्मजासी । देवासी विष्णुपुत्रासी । ब्रह्मपुत्रासी सूर्यपुत्रासी । विघ्नहारका तुज नमन ।।९२।। शक्तिपुत्रासी शेषपुत्रासी । सर्वपुत्रासी सर्वेशासी । सर्व मातृपितृरूपासी । परेशा नमन तुला असो ।।९३।। परात्परतरासी सिद्धिबुद्धिपतीसी । सिद्धिबुद्धिप्रचालकासी । हेरंबासी महेशांच्या महेशासी । परमात्म स्वरूपा तुज नमन ।।९४।। स्रष्ट्यासी पालकासी संहर्त्यासी । सर्वासी वरदात्यासी । अनादिसिद्धासी देवासी । नमो नमः पुनः पुन्हां ।।९५।। तुझ्या मायेनें मोहित । अपराधयुक्त मीं मदोन्मत्त । आतां शरण तुज विनीत। क्षमा करी माझ्यावरी ।।९६।। पूर्वीं मज पाहून हर्षयुक्त । असती देवतादी जगांत । आतां मज पाहून दोषयुक्त । भयातुर ते सारे ।।९७।। म्हणोनी मज न पाहती । पापी पापरूपी मीं जगतीं । निर्दोष करी विघ्नेशा सांप्रती । करुणालया नमन तुला ।।९८।। विघ्ननिवारणा तुझें दर्शन । सर्वदा घडो मज पावन नमन । त्यानें कृतकृत्य होईन । योगिसंमत मीं सतत ।।९९।। ऐसें बोलून भक्तियुक्त । देवा संन्निध नाचत । रोमांच अंगावरती उठत । डोळ्यांत दाटले आनंदाश्रू ।।१००।। ते पाहून ढुंढी म्हणत । तूं रचिलेलें स्तोत्र असत । माझें आवडतें जगांत। अपराध सारे क्षम्य होती ।।१०१।। सर्व सिद्धिप्रद पूर्ण होईल । नाना सुखकारक अमल । जो हें स्तोत्र वाचील । ऐकेल तथा भक्तिभावें ।।१०२।। जैसा पूर्वी तूं स्थित । तैसाचि चंद्रा राहे सांप्रत । परी ज्या दिनीं उपहासयुक्त । तो दिवस निंद्य तुजसंबंधीं ।।१०३।। माझ्या ललाटीं भूषण । होई तूं सेवापरायण । कृष्ण चतुर्थी व्रतांत पूजन । करितील माझे भक्त तुझें ।।१०४।। मज पुजून तारेशा तुजप्रत । अर्घ्य देतील भक्त । त्यांची इच्छा पूर्ण होत । व्रत तेव्हांचि पूर्ण होय ।।१०५।।

तुझी पूजा न करितां । चतुर्थी व्रताची न होय सांगता । आज द्वितीया सायंकाळ असतां । कृपा केली तुजवरी ।।१०६।। या कारणें शुक्ल द्वितीया तिथी । असता मान्य तूं होय जगतीं । द्वितीयेस प्रयत्नें करिती । मानव तुजला नमस्कार ।।१०७।। ऐसे जे व्रत करतील । त्यांचें महिन्याभराचें दूर होईल । दु:ख भय चिंता मल । अन्यथा ना सिद्धि प्राप्ति ।।१०८।। ऐसें बोलून गजानन । चंद्र पुनीत होतां अन्तर्धान । त्यावेळीं देवेश येऊन । चंद्रास सांगती वृत्तान्त ।।१०९।। चंद्र त्यांचा सन्मान करित । आदरें तयांस पुजित । नंतर त्यांच्या समवेत । गणेशाची स्थापना करी ।।११०।। ब्राह्मणा समवेत स्थापून । करी गणेशाचें तो पूजन । गणेशाच्या भाळीं विराजमान । जाहला तेव्हां पासून चंद्र ।।१११।। भालचंद्र ऐसें नाम ख्यात । जाहलें तैं जगतांत । देव ब्राह्मण पूजा करित । गणेशाची त्या समयीं ।।११२।। चंद्रास निर्दोषत्व लाभत । तदनंतर देव स्वर्गीं परतत । चंद्र स्वअंशरूपें राहत । दशरथा तै स्वर्गांत ।।११३।। परी पूर्णरूपें विघ्नेशा सेवित । आदरें नित्य भक्तियुक्त । तो अत्रिसमुद्भव करित । गंगातीरावरी निवास ।।११४।। विधु भालचंद्रासी सेवित । भक्तितत्पर जगतांत । एकदा देवांनी संप्रार्थित । हरि जन्मला यादवकुळीं ।।११५।। वासुदेव तो झाला । न कळत चन्द्रास पाहता झाला । भाद्रपद शुक्ल चतुर्थीला । दोषयुक्त तैं होय ।।११६।। त्याचें अन्तर्ज्ञान बळ लोपलें । चित्त नरतुल्य जाहलें । विघ्नही एक उद्भवलें । तेव्हां त्याच्या जीवनांत ।।११७।। सत्राजित नाम एक नृपती । त्याची यादवांत ख्याती । राजर्षीच्यावरी त्या प्रीती । सूर्यनारायणें केली ।।११८।। सूर्याचें तप शत संवत्सर । करितां कृपा लाभत अपार । सूर्यें दिधला होऊन उदार । आपुल्या गळ्यांतील मणि त्याला ।।११९।। त्या मण्याचें नांव ख्यात । स्यमंतक हें जगांत । तें रत्न बांधी गळ्यांत ।

सत्राजित भक्तिभावें ।।१२०।। अष्ट भार सोनें नित्य । तो स्यमंतक मणि अद्भुत । सूर्यतेजासम शोभत । यदुनंदनाच्या गळ्यांत ।।१२१।। द्वारकेंत तो सूर्यभक्त । सत्राजित यादव निवसत । शुचिभावें पूजित । रत्न तें तो निरंतर ।।१२२।। नंतर बहु काळ जात । तेव्हां कृष्ण दोषयुक्त । त्याच्या मनीं बुद्धि उपजत । स्यमंतक मणि लाभार्थ ।।१२३।। एकदां सभेंत संस्थित । सत्राजितास कृष्ण म्हणत । विनयपूर्वक वचन लोभयुक्त । उग्रसेना राजा आम्हीं केलें ।।१२४।। यादवांच्या त्या राजास । यादव पूजिती सविशेष । दिग्विजयांत लब्ध राज्यास । आम्हीं दिधलें आनंदें ।।१२५।। तरी आता तूं देई मजप्रत । स्यमंतक मणि विशेषयुक्त । सुवर्ण जें मणि संभूत । तें तूं नित्य घेत जाई ।।१२६।। तो मणि शोभेसाठीं गळ्यांत । बांधावा तूं ऐसें विनवित । तेव्हां सत्राजित क्रोधयुक्त । श्रीकृष्णासी सांगतसे ।।१२७।। प्रसेनाला जो दिला । तो आता घेऊन बैसला । ऐसें बोलून परतला । सत्राजित स्वगृहासी ।।१२८।। स्वानुजास मणि देत । स्ववृत्तांत त्यास कथित । पुढें एकदा कृष्णासहित । यदुनंदन जातीं मृगयेसी ।।१२९।। तेव्हां अशुचि स्वभावें बांधित । प्रसेन तो मणि गळ्यांत । तोही त्यांच्या सवें जात । वनांत मृगया खेळण्या ।।१३०।। अशुचित्व दोषें वनांत । सिंह त्या प्रसेनासी मारित । अश्वासहित विदारित । मणि घेऊन पळाला ।।१३१।। पुढें जांबवान त्या सिंहास । मारून मणि नेई स्वगृहास । दाखवी आपुल्या पुत्रीस । तिजही तो आवडला ।।१३२।। तेव्हां तो महाबळी तिज म्हणत । तुझा जो भर्ता होईल भाविकालांत । त्यास हा मणि देईन निश्चित । आजपासून मणि तुझा हा ।।१३३।। सायाह्नीं सर्व यादव परतत । आपापल्या मंदिरांत । प्रसेनाविहीन त्यांस पाहत । सत्राजित तैं क्रुद्ध झाला ।।१३४।। अहो कृष्णें माझा भ्राता । मारिला यांत संशय न चित्तां।

मणिलोभवशें पापी तत्त्वतां । ऐसें दुष्ट आचरला ।।१३५।। पुरजन विश्वास ठेविती । उग्रसेनादि कृष्णा निर्भत्सती । तेव्हां कृष्ण दु:खित चित्तीं । ध्यान करण्या बैसला ।।१३६।। परी सामान्य जनांसमान । कुंठित झाला जनार्दन । लुप्त झालें दिव्य ज्ञान । दोषकारण न सांपडले तया ।।१३७।। नंतर तो अति दु:खित । होऊन विचार करी मनांत। अंतर्ज्ञानाचें बळ सांप्रत । कोठें गेलें कळेना ।।१३८।। मी नरतुल्य कैसा झालों । जननिंदेला पात्र बनलों । वृथा लांछनें दूषित झालों । देहत्याग करीन आतां ।।१३९।। तदनंतर जाऊन सभेंत । घेऊन यादव मुख्य जात । प्रसेनाचा शोध करण्या निश्चित । महाद्युती तो तेधवां ।।१४०।। प्रसेनाची पाउलें उमटलीं । त्यानुसार शोध सरणि आखिली । तेव्हां अश्वासहित पाहिली । मृत मूर्ती प्रसेनाची ।।१४१।। मणिहीन तो असत। सिंहें मारिला यादवसुत । ते सर्व पुढें जात । सिंहमार्गाचा घेत शोध ।।१४२।। तेथ महावनीं दिसत । सिंह पडला होता मृत । कोणा ऋक्षानें वधिला असत । परि तो मणि न सापडला ।।१४३।। भयसंकुल ते पाहात । अस्वलाची पदचिन्हें विहित । त्यानुसार पुढती जात । यादव मुख्य ते सारे ।।१४४।। तेव्हां एका घोर गुहेंत । एक अस्वल प्रवेशत। तें पाहून कृष्ण प्रवेशत । त्या गुहेमाजीं सावध ।।१४५।। अन्यांस बिलद्वारीं स्थापून । कृष्ण आंत प्रवेशून । लांच्छन दूर करण्या उद्युक्त मन । शोध घेऊं लागला ।।१४६।। योजनमात्र बिळांत जात । तेव्हां प्रकाश पाहत । एक संस्थान शोभिवंत । सुविस्तृत तेथ दिसलें ।।१४७।। पाळण्यांत त्याला दिसत । तेथ स्यमंतक मणि तो अद्भुत । तो पाहून हर्षयुक्त । हळुवारपणें पुढे गेला ।।१४८।। एक शिशु पाळण्यांत । होता तेथें निद्रिस्त । जांबवंतपुत्री अकस्मात । बाहेर आली त्या वेळीं ।।१४९।। अपरिचित पुरुषासी पाहत । तेव्हां ती भयग्रस्त ।

मोठ्यानें आक्रोश करित । ते रुदन ऐकलें जांबुवंतें ।।१५०।। श्रीकृष्णास तो पाहत । येई बाहेर त्वरित । विष्णुसह त्वेषे लढत । एकवीस दिवस युद्ध झालें ।।१५१।। यादव सारे वाट पाहून । आठव्या दिनीं गेले परतून । द्वारकेत वृत्तान्त कथून । विह्वल झाले मानसीं ।।१५२।। आम्हीं सात दिवस वाट पाहिली । परी आमुची निराशा झाली । श्रीकृष्णाची स्वारी न आली । गुहेबाहेरी त्या अवधींत ।।१५३।। तो श्रीकृष्ण मृत वा जीवित । हें न कळे आम्हांप्रत । वसुदेवादि शोक करित । स्त्रियांसहित दु:खानें ।।१५४।। उग्रसेनादी सर्व रडती । दु:ख झालें त्यांना अती । आता शत्रु प्रबल होती । जरासंधादि निश्चित ।।१५५।। यादवांनो आतां काय होणार । कृष्णरहित आम्हीं हरणार । शत्रूच्या हस्तें मरणार । सगळे यादव आपण ।।१५६।। ऐसा विलाप ऐकत । बलराम तेव्हां सांत्वन करित । बहुविध युक्तिवाद करित । नि:श्वास सोडति नृप सारे ।।१५७।। दु:खयुक्त भयातुर । सत्राजिता निंदिती समग्र । तोही दु:खें ग्रस्त फार । भयसंकुल जाहला ।।१५८।। तिकडे जांबवान कृष्णाप्रत । घनगंभीर स्वरें म्हणत। कोण तूं वीर तेजयुक्त । युद्ध करिसी माझ्यासवें ।।१५९।। कृष्ण त्यास सांगे प्रतिवचन । मी यदुवंशी उत्पन्न । माझें नांव कृष्ण जाण । महामते तूं जांबवाना ।।१६०।। तें ऐकतां खेद होऊन । जांबवान करी नमन। रामानें जें रम्य वचन । पूर्वी दिलें तें सत्य झालें ।।१६१।। तो तूं विष्णु देव आलास । मी असे तुझा दास । करुणानिधे तूं या दासास । क्षमा केली पाहिजे ।।१६२।। अज्ञानानें शक्तिगर्व होऊन । युद्ध केलें हा दोष महान् । तो आतां क्षम्य करून । कृपा करी तूं मजवरी ।।१६३।। नंतर स्तुति करून । त्यानें पूजिला कृष्ण भगवान । वृत्तान्त सारा सांगून। सांत्वन करी कृष्ण त्याचें ।।१६४।। तेव्हां जांबवान कृष्णा देत । मणि

तो कन्येसहित । त्या दोघांचा स्वीकार करित । कृष्ण तेव्हां आनंदें ।।१६५।। नंतर द्वारकेंत परतत । कृष्णा पाहून हर्षयुक्त । सर्वही यादव उत्सव करित । सत्राजिता बोलाविती ।।१६६।। सर्वांच्या देखत तयाप्रत । स्यमंतक मणि परत देत । सत्राजित मानसीं निंदित । आपुल्या देहासी त्या वेळीं ।।१६७।। कृष्णाचा विरोध मीं केला । अविचारें आळ घातला । म्हणोनी घे प्रायश्चित्ताला । सत्राजित त्या समयीं ।।१६८।। सत्यभामेसहित मणि अर्पित । महात्म्या श्रीकृष्णाप्रत । आणि सासरा होऊन विनवित । जावयासी तो वीर ।।१६९।। सूर्यभक्ति समन्वित। रक्षण करी मणि तूं सतत । दौहित्र तुझे घेतील भविष्यांत। अद्भुत हा महामणि ।।१७०।। त्या वेळीं वृत्तान्त ऐकत । पांडव लाक्षागृहांत । कुंतीसह दग्ध अवचित । तें ऐकून यादव रडती ।।१७१।। पुरोचन हा वृत्तान्त । जेव्हां यादवांस निवेदित । तेव्हां बलरामासहित । कृष्ण गेला हस्तिनापुरीं ।।१७२।। धृतराष्ट्रादि दुःखित । शोकसंकुल रुदन करित । शतधन्वा अक्रूर कृतवर्मा संगत । क्रोधयुक्त ते सारे ।।१७३।। सत्राजितें कन्यार्थ आमंत्रित । आपण यादव वीर भूतकाळांत । आम्हांस त्यागून कृष्णाप्रत । अर्पण केली कन्या त्यानें ।।१७४।। कृष्ण पांडवांच्या शोकें आर्त । तेथेच राहिला असत । आतां तिघांनी अवचित । एक कार्य करूं या ।।१७५।। आपण तिघे सत्राजिता मारून । मणि बळकावूं महान । ऐसा विचार करून । रात्रीं गेला शतधन्वा ।।१७६।। सत्राजितास ठार मारून । मणि घेतला हिरावून । तो तैलद्रोणींत टाकून । कृष्णाकडे तो गेला ।।१७७।। आपुला श्वशुर झाला हत । हें ऐकून कृष्ण कुपित । शतधन्वा तें जाणून जात । अक्रूरासमीप त्या वेळीं ।।१७८।। अक्रूर त्याचा त्याग करित । तेव्हां कृतवर्म्यासमीप जात । तोही त्याचा पक्ष न घेत । पुन्हा अक्रूरापाशी

आला ।।१७९।। मणि तेथेच टाकून । भयसंकुल गेला पळून । चपल घोडीवर बसून । शतयोजन वेग जिचा ।।१८०।। शतधन्वा जाय पळून । वृत्तान्त हा जाणून । संकर्षणासह पाठलाग करून । पकडण्या धावला रथारूढ ।।१८१।। शतयोजनें जाऊन । घोडी पडली मरून । शतधन्वा भयभीत मन । पळू लागला पायांनी ।।१८२।। तो पायीच धावत । हें जेव्हां कृष्णास कळत । तोही रथ सोडून करित । पाठलाग तयाचा ।।१८३।। शतधन्व्यासी गाठून । चक्र फेकून त्यास मारून । शोधिला स्यमंतक मणि उत्तम । परी त्याला तो न मिळाला ।।१८४।। म्हणून शोकसमायुक्त । बलभद्रासी तो म्हणत । शतधन्वा मणियोगें हत । माझ्या हातून अग्रजा ।।१८५।। तेव्हां रोहिणीसुत कोपयुक्त । म्हणे कृष्णासी संतप्त । महाखला तूं मिथ्या सांगत । मणि लपविला आहेस तूं ।।१८६।। अग्रजासी मणि लागेल द्यावा । ह्या लोभें तूं असत्याश्रय घ्यावा । हें निंद्य कृत्य केशवा । सर्वथैव मज वाटे ।।१८७।। नंतर केशव सान्त्वन करित । अग्रजाचें विनययुक्त । द्विज देव गाईंची शपथ घेत । हें चौर्यकर्म मी न केलें ।।१८८।। परी त्याचा तिरस्कार करून । बलराम गेला निघून । राजनीतिज्ञ नृपतीस भेटण्या उन्मन । विदर्भात तो गेला ।।१८९।। नंतर अतिदु:खसंयुक्त । कृष्ण परम व्यथा भोगित । बलभद्रा स्मरून रडत । पुन: पुन्हां आवेगानें ।।१९०।। ज्ञानदृष्टीनें पाहत । परी कृष्णास मणि न दिसत । म्हणोनि तो अति दु:खित । रडू लागला पुन:पुन: ।।१९१।। अहो माझें दिव्य ज्ञान । कुठें लुप्त झालें महान । नरतुल्य झालों देव असून । धिक्कार असो जीवनाचा ।।१९२।। रथांत बैसून द्वारकेंत । महायश तो नंतर जात । उग्रास सारें वृत्त सांगत । विस्तारपूर्वक विषादें ।।१९३।। तेव्हां यादव मुख्य त्यासी निंदिती । कृष्ण सत्राजिताची उत्तरक्रिया करिती । देशोदेशींचे नृप करिती । निंदा

श्रीकृष्णदेवाची ।।१९४।। दुष्ट बुद्धीनें केलें । कृष्णानें हें नीच कर्म असलें । समर्था बलभद्रा त्यजिलें । दुर्मती त्या मणिलोभ्यानें ।।१९५।। महापापी तो असत । विश्वासपात्र न जगांत । लोक न वंदिती द्वारकेंत । श्रीकृष्णासी त्यामुळें ।।१९६।। सर्वांनी परित्यक्त दु:खित । श्रीकृष्ण व्यथा अनुभवित । जाहला क्षीण तो अत्यंत । अस्थित्वचा मात्र उरला ।।१९७।। ऐसा होता स्वसदनांत । नारद त्यास भेटण्या येत । पाहोनियां सुविस्मित । श्रीकृष्ण म्हणे तयासी ।।१९८।। मज सर्व लोकांनीं त्यागिलें । म्हणोनी एकलेपण आलें । आता दु:ख आश्रया आलें । घरांतच घालवितों वेळ ।।१९९।। परी परम भाग्य असत । म्हणोनि दर्शन तुझें घडत । तें ऐकून विचारित । नारद श्रीकृष्णासी प्रश्न ।।२००।। कां त्यजिलें लोकांनी तुला । सर्व वृत्तान्त सांग मजला । तेव्हां श्रीकृष्णांनी तयाला । सांगितलें घडलेलें सर्व ।।२०१।। नंतर नारद ध्यान लावित । दिव्य दृष्टीनें पाहत । देहत्यागोत्सुका कृष्णा म्हणत । ऐक कारण या दु:खाचें ।।२०२।। भाद्रपद शुक्ल चतुर्थीस पाहिला । चन्द्र तूं कृष्णा हा दोष घडला । त्या चन्द्रासी शाप मिळाला । पूर्वी त्या विघ्नराजाचा ।।२०३।। त्यायोगें तुज दु:ख प्राप्त । आतां देह त्याग करूं नको संतप्त । गणेशासी भज भावयुक्त । संकष्टीचें व्रत तूं करी ।।२०४।। तेणें चोरीचा आळ टळेल । अन्यथा मुक्ति न मिळेल । तो सज्ञान समर्थेश अमल । त्या विघ्नेशा शरण जाई ।।२०५।। ऐसें सांगून महायोगी जात । गणेशगान प्रेमें करित । वीणावादनीं लालस भक्त । नारद सोडून त्या स्थळा ।।२०६।। तदनंतर प्रहर्षानें युक्त । कृष्ण विघ्नेशाचें पूजन करित । आदरें ध्यान आचरित । दशरथा एकाक्षर मंत्रानें ।।२०७।। संकष्टीचें व्रत आचरित । रात्री ध्यानमग्न होत । तेव्हां गणराज प्रकटत । भक्तापुढें तो सुखप्रद ।।२०८।। कृष्णास जागें करित । ब्रह्मनायक तो गणेश

उदात्त । वरती उठून नमित । श्रीकृष्ण पूजी आदरानें ।।२०९।। पुनः पुनः प्रणाम करून । सामगायनें स्तुति करून । स्तोत्र अष्टक संज्ञ म्हणून । आनंदानें नाचला ।।२१०।। रोमांचित कृष्णास पाहून । गणेश तेव्हां बोले वचन । हृदयवांच्छित वरदान । माग कृष्णा मी प्रसन्न ।।२११।। गणेशाचें ऐकून वचन । महायश कृष्ण खिन्नमन । भक्तियुक्त तो बोले वचन । विघ्नेशा तुझी भक्ति देई ।।२१२।। जरी तूं मजवरी तुष्ट असत । दृढ भक्ति दे मजप्रत । भाद्रपद शुक्ल चतुर्थीस चन्द्र पाहत । ते जन होवोत शापहीन ।।२१३।। मी आसन्न मरण झालो । ज्ञानवर्जित दुःख पावलों । अन्यांची काय वार्ता उमजलों । म्हणून प्रार्थी तुजला मी ।।२१४।। तेव्हां गणनाथ भक्तिमोहित । त्या श्रीकृष्णासी म्हणत । माझी दृढ भक्ति तुझ्या चित्तांत । अनघा सदैव राहील ।।२१५।। स्यमंतकाचें महिमान । तुला जें आलें लांच्छन । हें सर्व जो ऐकेल । वरदान त्यास लाभेल ।।२१६।। हें जो भावबळें वाचील । मजला हृदयीं ठेवील । तो दोषहीन होईल । त्यांत संशय अल्प नसे ।।२१७।। श्रीकृष्णा तुझा दोष सरेल । आळ खोटा जाईल । यश पूर्ववत् पसरेल । ऐसें माझें वरदान ।।२१८।। ऐसें सांगून गणेशान । कृष्णास भक्तिपरायण प्रसन्न । जाहला झणीं अन्तर्धान । कृष्ण तेथेचि राहिला ।।२१९।। संपूर्ण जागरण करून । पंचमीस गणेश पूजुन । विशेषें देई बहुविध दान । तेणें गणेशकृपा लाभत ।।२२०।। अंतर्ज्ञान परत लाभत । अक्रूरकृत मणिचौर्य जाणत । सभेंत जाऊन अक्रूराप्रत । आवाहन तेव्हां त्यानें केलें ।।२२१।। त्यास प्रणाम करून । महाभागास बोले हसून । शतधन्व्यानें मणि तो महान । तुझ्या घरीं टाकिला असे ।।२२२।। बलभद्रासाठी मानदा दाखव । मणि तो आम्हां अभिनव । तेव्हां अक्रूर आणी भययुक्त भाव । मणि तो सभेमध्यें तदा ।।२२३।। तें पाहून

उग्रसेन मुख्य प्रशंसित । जनार्दनासी पूजित । अक्रूर विदर्भांत जात । हलधरासी मणि द्यावया ।।२२४।। त्यास मणि देऊन । सन्मानें परत आणून । जेव्हां सभेत बसविला प्रसन्न । तेव्हां सर्वां मोद झाला ।।२२५।। महावीर तो समागत । पाहून केशव हर्षयुक्त । द्वारकानिवासी आदर करित । निर्दोषत्व पटून कृष्णाचें ।।२२६।। नानादेशनिवासी मुदित । तैसेचि राजे मित्रयुक्त । आनंदोत्सव तेव्हां मानित । आळ सरला श्रीकृष्णाचा ।।२२७।। सर्वांच्या हृदयीं संस्थित । बुद्धिनायक हा गणेश जगांत । त्याच्या कृपेनें दुर्लभ नसत । कांहींही गणेशभक्तांना ।।२२८।। म्हणोनी भाद्रपद शुक्ल चतुर्थीस । चन्द्रदर्शन वर्ज्य करावें विशेष । परी होता दर्शनास । हें चरित्र भक्तीनें वाचावें ।।२२९।। त्यायोगें दोषविहीन होईल । अन्यथा भ्रष्टभाव नरकीं जाईल । स्यमंतक मणि चरित्र विमल । ऐकतां चन्द्रदर्शन दोषहरती ।।२३०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते भाद्रपद शुक्ल चतुर्थी चन्द्रदर्शनदोषहरणचरितवर्णनं नाम षष्ठोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सहावा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दशरथ म्हणे ऐकिलें । वसिष्ठा महा व्याख्यान चांगलें । वेदवेत्या तुझ्यापासून भलें । उभय चतुर्थींचें माहात्म्य ।।१।। तथापि मजसी हें व्रत । वर्णावें पृथक् रीत्या अद्भुत । याचें समग्र चरित । कोणी केव्हां हें केलें? ।।२।। यापासून सिद्धि कोणती । कोणा लाभला गणपती । व्रताची ऐकून महती । तृप्ति पावेन आदरानें ।।३।। मुद्गल सांगती दक्षाप्रत । तेव्हा वसिष्ठ दशरथा सांगत । प्रजानाथा ऐक सुखद

व्रत । शंभु आदींनी पूर्वी उपासिलें ।।४।। कृष्ण शुक्ल चतुर्थीव्रत । उपोषणपर तें आचरित । नंतर ब्रह्मादिदेव करित । सर्व अर्थसिद्धिद हें व्रत ।।५।। तदनंतर सर्व मुनिगण करिती । अन्य वर्णस्थलोक आचरिती । आतां या व्रताची उत्पत्ती । पृथकत्वें तुज सांगेन ।।६।। या व्रताचें माहात्म्य सर्वद । पुण्यकारक तें सुखद । संक्षेपें ऐक हे पुण्यप्रद । पूर्वी भरत नाम राजा होता ।।७।। तो भरत दुष्यन्तसुत । तेजस्वी वीरमुख्य प्रतापवंत । वीरमुख्येश भूमंडळ सर्व जिंकित । सार्वभौमपद मिळवी ।।८।। सप्तद्वीपा वसुधा पाळित । भरत नृप तो धर्मसंयुत । त्याच्या देशीं अनावृष्टि होत । दैवयोगें सुदारुण ।।९।। सर्व लोक भयभीत झाले । चराचर व्यथेनें पीडित झाले । तें पाहून ठरविलें । महायश भरत नृपानें ।।१०।। कण्व मुनिवरा शरण जात । शांतासी त्या प्रणाम करित । महात्म्यासी पूजित । भक्तिपूर्वक कर जोडी ।।११।। त्याच्यापुढे विनम्र स्थित । तेव्हां कण्व महायोगी म्हणत । गाणपत्यप्रिय जो ख्यात । राजसत्तमा भरतासी ।।१२।। कां केलेस आगमन । कुशल आहेत ना प्रजाजन । देशांत सर्वत्र प्रसन्न जन । आहेत ना सांग मजला ।।१३।। त्या उत्तम आसनीं बसून । सर्व सांग विश्वासून । कण्वाचें वचन ऐकून । हर्षयुक्त तो महीपती ।।१४।। मुनिदत्त आसनीं बसत । हात जोडूनी त्यास प्रार्थित । वेदवेत्त्या महात्म्या कण्वाप्रत । राजनीतिज्ञ भरत तैं ।।१५।। भक्तियुक्त तो म्हणत । कण्वा आपुल्या प्रसादें असत । योगींद्रा कुशल माझें जगांत । दैवयोगें परी दुःख झालें ।।१६।। नित्य स्वधर्मयुक्त करित । पृथ्वीचें पालन मी धर्मरत । देवविप्र अतिथि प्राज्ञा तोषवाया झटत । योगिसत्तमा मी सर्वदा ।।१७।। वर्णाश्रमाचार जन पाळिती । परी पापज दुःखाची स्थिती । कां माझ्या राज्यांत पीडा ती । समजेना हें मजला ।।१८।। पाऊस पडेना राज्यांत । सर्वत्र दुःख

पसरत । चराचर भयोद्विग्न होत । रसहीन सर्व झालें ।।१९।। त्यासाठीं महायोग्या शरण । आलों विशेषें उन्मन । आपुल्या दर्शनाचें लाभलें पुण्य । सफल माझा जन्म झाला ।।२०।। आतां पापाचें स्वरूप सांगावें । तें मी सत्वर दूर करावें । त्यायोगें नभ वर्षावें । मानदा माझ्या राज्यांत पूर्ण ।।२१।। मुनिसत्तम त्या नरशार्दूलाप्रत । कण्व तेव्हां दयायुक्त । ऐकून तो वृत्तान्त समस्त । अनावृष्टीचें कारण सांगे ।।२२।। ऐक राजा तुझ्या राज्यांत । महत् पाप असे घडत । त्या योगें पाऊस न पडत । दु:ख महान सर्वां झालें ।।२३।। तुझें राज्य चार पुरुषार्थविहीन । होईल यांत संशय नसून । सुशील सर्वही जन । पाप घोर त्यांनीं केलें ।।२४।। तूंही पापशीलभावें वर्तसी । धमार्थकाममोक्षहीन अससी । पुरुषाधमा विसरलासी । चतुर्थीव्रत सर्वार्थसिद्धिद ।।२५।। शुक्लकृष्ण चतुर्थीचें व्रत । तुझ्या राज्यीं नष्ट होत । स्थूलसूक्ष्मभावें वर्तत । चतुर्विध जग तें संकष्ट ।।२६।। जी चतुर्विध संकष्ट हरी । ती संकष्टचतुर्थी खरी । सांगितली कृष्ण चतुर्थी तुज दु:खहरी । परी तूं ती न केलीस ।।२७।। जी चतुर्विध फळ देत । ती शुक्ला चतुर्थी वरदा ख्यात । जरी नसलें संचित तरी देत । व्रतकारी जनास ती ।।२८।। ऐसें सांगून विस्तारें वर्णित। चतुर्थीचें माहात्म्य अद्भुत । स्वशिष्यासी भरतासी पुनीत । शिष्यप्रेमें तदनंतर ।।२९।। अन्य व्रतें चतुर्थीहीन । होती सर्वही निष्फळ अपावन। तें समजतां प्रणाम करून । भरत म्हणे हर्षयुक्त ।।३०।। स्वामी गणेशाचें हें व्रत । सांगा पुनरपि मजप्रत । करीन मी तें भावयुक्त । सर्वसिद्धिप्रद जें असे ।।३१।। तेव्हां कण्वमुनी त्यास सांगत । क्रतु ब्रह्मपुत्र मज कथित । पूर्वीं हें परम पुनीत । व्रत तें तुज मी सांगतों ।।३२।। ऐक राजा गणेशमहिमा पुनीत । एकदा मी होतों स्वाश्रमांत । तपाचें आचरण करित । वायु भक्षून रहात होतों ।।३३।। माझ्या महा तपें व्याप्त ।

जाहलें चराचर समस्त । तथापि योगाश्रयें सतत । विशेषें मी राहिलों ।।३४।। कण्व सांगे भरताप्रत । ऐसी कथा ही अद्भुत । प्रजापति आला साक्षात । तदनंतर आश्रमीं माझ्या ।।३५।। क्रतु योगींद्रवंद्य तो येत । गाणपत्य महायशा पुनीत । त्यास प्रणाम करून मी पूजित । हात जोडून पुढें उभा ।।३६।। तेव्हां तो भक्तवत्सल म्हणत । आसनावरी या बैस अचकित । तुझी इच्छा सांग त्वरित । ती मी ताता पूर्ण करीन ।।३७।। त्याचें तें वचन ऐकून । मीं चित्तीं हर्षित होऊन । आसनावरी बसून । विनयपूर्वक प्रार्थिलें ।।३८।। तुमच्या दर्शनमात्रें सांप्रत । जाहलों कृतकृत्य मी शांत । आता शांतिदयोग पूर्णत्वें मजप्रत । दयानिधे मज सांगा ।।३९।। क्रतु म्हणती कण्वा उत्तम । श्रेष्ठ प्रश्न केलास अभिराम । महाभागा सांगेन मनोरम । वृत्तान्त कथिला जो ब्रह्मदेवें ।।४०।। तप सोडून योगमार्गीं परायण । मी अशांत झालों जाण । योगभूमीचें प्रसाधन । नित्य नेमें जरी केलें ।।४१।। नंतर ब्रह्मदेवाप्रत जात । सर्वज्ञा त्या पित्यास सांगत । व्यथा माझी मी विनयान्वित । योगशांति कैसी लाभेल ।।४२।। ऐसें विचारी तयाप्रत । शांतिप्रद ब्रह्म कैसें असत । कोणत्या योगें तें प्राप्त । तें सर्व सांगा मजला ।।४३।। ब्रह्मा तेव्हां मज सांगत । योगशांतिप्रद ब्रह्म तुजप्रत । पुत्रका गणेशपर पुनीत । विशद करीन सर्वही ।।४४।। मनोवाणीमय सर्व त्यागावें । योगाच्या सेवेनें भजावें । मनोवाणीविहीन जें आघवें । तें सर्व शांतिब्रह्म ।।४५।। मी गणेश असुनी न भिन्न । ब्रह्मनायक परम पावन । मनोवाणीमय 'ग'कार असून । मनोवाणीविहीन 'ण'कार ।।४६।। वेद ऐसें सांगतात । तेंचि असे सर्वसंमत । त्यांचा स्वामी गणेश असत । गकार णकार यांच्या योगें ।।४७।। गणांचा पति तो गणपति । तो समाधि योगे लाभें जगतीं । गकाराक्षरग ज्ञान चित्तीं । वेदवादें जाणावें ।।४८।। जें महामते

चित्तानें न लाभत । तें णकार जाण पुनीत । ज्ञानाज्ञानमय चित्त । तें त्यागितां शांतिलाभ ।।४९।। हेंच परम गुह्य असत । शांतिप्रद भज तूं भावसंयुक्त । एकाक्षर महामंत्राचें व्रत । महामते तूं घेई ।।५०।। ध्यानयोगें तूं प्राप्त करशील । विघ्नेशासी विमल । ऐसें बोलून महामंत्र निर्मल । दिला त्याने मजलागीं ।।५१।। त्यास प्रणाम करून । मी गेलों वनांत निघून । केलें योगाचें साधन । क्रमें त्यजिली चित्तभूमि ।।५२।। चिंतामणीवर माझें चित्त । मी केलें पुत्रा आक्षिप्त । तद्रूप भाव होतां जगांत । योगींद्रवंद्यता मी पावलों ।।५३।। गणेशध्यानसंयुक्त । त्याच्या भक्तिकामनेने होत । तेव्हां विघ्नपति साक्षात । दर्शन मज देता झाला ।।५४।। त्याची स्तुति मीं करित । तेव्हां तो स्वभक्ति मज देत । तेव्हांपासून गाणपत्य दृढचित्त । सर्ववंद्य मी झालों ।।५५।। म्हणून तूंही गणराजास । योगकामनेनें भज सुरस । ऐसें सांगून त्या समयास । महायोगी मज मंत्र देई ।।५६।। एकाक्षर मंत्र यथान्याय देऊन । योगी पावला अंतर्धान । कण्व म्हणे मी तेव्हापासून । गणेशाची साधना करितों ।।५७।। जरी मज शांति लाभली । तरी उपासना नेमें केली । अनन्यमनें जोपासली । अखंडित मीं अद्यापीही ।।५८।। म्हणून तूंही राजेंद्रा भजावें । त्या विघ्नपतीस भक्तिभावें । चतुर्थीव्रत नेमें करावें । तेणें होशील ब्रह्मभूत ।।५९।। नंतर एकाक्षर मंत्र देत । कण्व मुनि त्या नृपाप्रत । कण्वास प्रणाम करून परतत । राजधानींत तेव्हां तो ।।६०।। तदनंतर शुक्ला भाद्री चतुर्थी येत । नगरस्थ जनांसह ती आचरित । नृप तो अत्यंत श्रद्धायुक्त । घोषणा करी स्वनगरांत ।।६१।। शुक्ल कृष्ण चतुर्थी न करतील । ते जन दंडनीय ठरतील । पीडा तयांसी होईल । म्हणोनी सर्वजन व्रत करिती ।।६२।। त्या पुण्ययोगें वृष्टि होत । राजर्षीच्या राज्यांत । हृष्टपुष्ट जन समस्त । नृपात्मजा तेथ झाले ।।६३।। रोगादि

दोषहीन होऊन । ते करिती गणनायकाचें भजन । भरत करी अनन्यभावें पूजन । गाणपत्यप्रिय तैं झाला ।।६४।। तो पुत्रास राज्य देऊन । वनांत अन्तीं करी गमन । स्वानंदग व्रताचरणें होऊन । ब्रह्मभूत जाहला ।।६५।। क्रमें भूमिसंस्थ जे जन । चतुर्थीपुण्ययोगें पावन । होऊन योगपरायण । स्वानंदग ते येथ होती ।।६६।। भरताच्या स्पर्शमात्रें होत । कीटादिक पुण्यरूप जगांत । अन्तीं स्वानंदांत लीन होत । ऐसा तो नृप पुण्यशाली ।।६७।। त्यानें यज्ञ करून बहुत । सर्व धरा केली चित्रित । पुण्यकारी त्या भरतासम नसत । कोणी राजा भूतलावरी ।।६८।। ज्ञानें यशें धर्मशालिनतेंकरून । भरत अपूर्व नृप महान । भाद्रपद शुक्ल चतुर्थीचें महिमान । कथिलें तुज दशरथा ।।६९।। जो हें माहात्म्य ऐकत । अथवा भक्तिभावें वाचित । त्यास चतुर्वर्ग फळ लाभत । ब्रह्मभूयप्रद अन्तीं ।।७०।। भाद्रपदीं शुक्ल पक्षांत । चतुर्थी तिथी पुनीत । त्या दिनीं प्रकट होत । शंकरहृदयीं गजानन ।।७१।। मध्यान्हीं तो व्यक्त होत । ध्यानजात तो सुत । तेव्हांपासून ती तिथि लाभत । मुख्यत्व गणेशजन्मानें ।।७२।। ही ब्रह्मभूयप्रदा संशयातीत । सृष्टीच्या प्रारंभीं स्थापित । पंच देवेश मयूर क्षेत्रांत । गणनाथाची मूर्ति उत्तम ।।७३।। माध्यान्हीं भाद्रपद शुक्लपक्षांत । चतुर्थी तिथि ती पुण्ययुक्त । भाद्रपदमासीं तो होत । मयूरेशाचा अवतार ।।७४।। शंकरगृहीं अवतार झाला । सर्वांसी परम पूजनीय भला । त्याची आठवण राहण्याला । मृण्मय मूर्ति प्रतिवर्षी ।।७५।। मोरयाची ऐशी मूर्ती । शंकरमुख्य देव पूजिती । महोत्सव आनंदें करिती । विघ्नहीन ते सर्व ।।७६।। ऐसें जे जन पूजिती । ते सुखभोगी होती । अन्तीं स्वानंदपद पावती । ब्रह्मभूतत्व त्यांस लाभे ।।७७।। गणेशाचें माध्यान्हीं पूजन । विशेषें करिती कथन । चतुर्थी तिथीस उपोषण । पंचमीस करावे पारणा ।।७८।। द्विजांसह भोजन

करून । करावी ती मृण्मयी मूर्ति विसर्जन । जळांत सोडूनियां मन । लावावें गणेशस्मरणांत ।।७९।। चतुर्थीस मृण्मय मूर्ति । जे जन ना पूजिती । त्यांची सर्व कर्में होतीं । निष्फळरूप या जगतांत ।।८०।। अशांचें घेऊ नये दर्शन । आत्महित जे इच्छिती त्यांनी कदाचन । ते पतित ऐसें शास्त्रवचन । नरकांत जाती पापी ते ।।८१।। जे मृण्मय मूर्ति न पूजिती । ते विघ्नें पीडित होती । नाना रोगांनी संतप्त चित्तीं । दारिद्र्यादि समायुक्त ।।८२।। महापापी त्यास मानिती । ऐसी शास्त्राची उक्ती । म्हणोनी सर्ववर्णस्थ पूजिती । भाद्रपद चतुर्थीस गजानन ।।८३।। मृण्मय मूर्ति पूजित । ते नर विघ्नहीन होत । त्यांचीं कामें साफल्ययुत । ऐसें माहात्म्य या चतुर्थीचें ।।८४।। भाद्रपद शुक्ल चतुर्थी व्रत । ऐसें हें आद्य कथिलें तुजप्रत । अन्य इतिहास पुरातन वर्णित । चतुर्थीच्या व्रताचा ।।८५।। द्रविड नगरांत चांडाल असत । कोणी एक कुष्ठ रोगार्त । परस्त्रीलंपट पापयुक्त । त्याची कथा ऐक आतां ।।८६।। भाद्रपद चतुर्थी शुक्लांत । असतां तो चांडाळ ज्वरें पीडित । दैवयोगें त्यास न मिळत । अन्नोदक त्या दिनीं ।।८७।। संपूर्ण दिवस उपवास घडत । पंचमीस तो मृत्यु पावत । तेव्हां दिव्य विमान येत । त्यास न्यावया गणेशलोकीं ।।८८।। त्याच्या अंगस्पर्शे जो वायु वहात । तो यमलोकीं पोहोचत । त्यायोगें तेथले नर होत । नरकांतलेही पुनीत ।।८९।। ते सर्वही यानीं बसत । स्वानंदक पुरींत जात । गणपतीचें दर्शन लाभत । ब्रह्मभूत तो चांडाळ झाला ।।९०।। अजाणता हें व्रत केलें । तरी तें पुण्यप्रद जाहलें । यथाविधि जर व्रत केलें । तर फळ मिळे यांत न आश्चर्य ।।९१।। चतुर्थीचें हें महिमान । सर्वथैव अशक्य वर्णन । चार पुरुषार्थांचा लाभ होऊन । अन्तीं व्रत हें मुक्ति देई ।।९२।। वसिष्ठाचें ऐकून वचन । दशरथ म्हणे विनीत मन । महाभागा दक्षा प्रसन्न । पुढील कथा ऐक

आतां ।।९३।। दशरथास कुतूहल वाटत । दोषी चांडाळ मृण्मय मूर्ति पूजित । गजाननाची तैं ब्रह्मभूत । त्वरित कैसा जाहला ।।९४।। वसिष्ठ सांगती तयाप्रत । उत्तम विचारिलेंस मजप्रत । लोकोपकारक ज्ञान पुनीत । सांगेन संशय नाशकारी ।।९५।। चांडाळास चतुर्थीचें ज्ञान नव्हतें । परी दुरात्मा न जाणतां व्रत करी तें । तेणें त्यास स्वानंदपद लाभतें । ऐसा प्रभाव गणेशाचा ।।९६।। इहलोकीं नाना जन । पावोनि विविध सुखें प्रसन्न । अंतीं स्वानंदांत निमग्न । चतुर्थीव्रतानें जाहले ।।९७।। त्यांतील एकाचें चरित । पूर्णत: वर्णन अशक्य असत । दशसहस्र वर्षे वर्णित। तथापि संपूर्ण न होय ।।९८।। म्हणोनि संक्षेपें वर्णन केलें । भाद्रपद शुक्ल चतुर्थीचें भलें । ज्यानें बहुत लोक तरले । भवसागर लीलेनें ।।९९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते भाद्रपद शुक्ल चतुर्थीव्रतवर्णनं नाम सप्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सातवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । वसिष्ठ दशरथासी सांगती । अश्विन शुक्ल चतुर्थीची महती । पुरातन इतिहास जो जगतीं । सर्वार्थसाधक सर्वदायक ।।१।। रैवतांतरीचा एक नृपती । जगांत होती ज्याची कीर्ति । धर्मधर नामें ख्याती । शास्त्रपारंगताची ।।२।। देव ब्राह्मण अतिथींचें पूजन । पुत्रवत् करी प्रजापालन । पंच यज्ञ परायण । नीतिज्ञ तो स्वहितरत ।।३।। त्याची भार्या गुणान्वित । सर्व लक्षण संयुक्त । पतिव्रता ती असत । विप्र देव अतिथि प्रिय ।।४।। त्या नृपतीच्या राज्यांत । गज अश्व रथ असंख्यात । धनुर्धारी पदाती अगणित । समृद्धि नानाविध होती ।।५।। सप्त द्वीपयुता पृथ्वींचे पालन । देवादींचें करी साहाय्य

प्रसन्न । असुरयुद्धांत विजय मिळवून । कीर्ती आपुली वाढवी तो ।।६।। परी एक न्यून होतें । पुत्राचें सुख त्यास नव्हतें । पुत्रार्थ नाना प्रयत्न केले होते । सर्वही परी ते निष्फळ ।।७।। तीर्थयात्रा बहुविध करीत । अनुष्ठानें व्रत असंख्यात । बहुविध पुण्य जरी मिळवित । तरी त्यासी सुत न झाला ।।८।। तेव्हां राज्य त्यागून वनांत । पत्नीसह राजा जात । भ्रमण करता महावनांत । राजर्षि तो प्रवेश करी ।।९।। सिंह व्याघ्रादींनी युक्त । प्राणिमात्रांस भयप्रद असत । ऐशा त्या घोर वनांत । सौभरि मुनिश्रेष्ठ तप करी ।।१०।। धर्मधर राजा त्यास पाहत । विनयपूर्वक प्रणाम करित । भार्येसहित स्तवन करित । कर जोडोनि त्यावेळीं ।।११।। सौभरि त्याचें स्वागत करित । उत्तम आसन बसण्या देत । म्हणे या उग्र वनांत । किमर्थ कोण तूं आलास? ।।१२।। तेव्हां महिपाल त्यास सांगत । कीर्तिमान नावेंही जो ख्यात । सर्व धर्मज्ञ विनीत । व्यथा आपुल्या मनांतली ।।१३।। द्रविड देशांत मी वसत । तेथ सार्वभौम राज्य करित । परी दैवयोगें मज नसत । पुत्रलाभाचें सुख ।।१४।। पुत्रार्थ बहुविध व्रतें केलीं । नाना तीर्थस्नानें झालीं । परी तीं सर्व व्यर्थ ठरलीं । म्हणोनि त्यागिलें मीं राज्य ।।१५।। पुत्रकामनेनें प्रेरित । संचार करता या वनांत । जाहलें तुमचें दर्शन प्राप्त । सर्व सिद्धिप्रद असें ।।१६।। तुमच्या दर्शनमात्रें सफल जन्म । मातापिता धन्य परम । आता पुत्रप्राप्तीचा उपाय अभिराम । सांगून कृपा करावी मजवरी ।।१७।। आपल्या आज्ञेंत मी राहीन । जैसे सांगाल तैसा वागेन । या जन्मीं पाप केलें नसून । मजला हें दुःख कां मिळालें? ।।१८।। धर्माची भीती मनीं ठेवून । देवाचा आदर करून । राज्य केलें मी नियम पाळून । तरीही वंध्यत्व कां आलें? ।।१९।। पूर्वजन्मीचें पाप असत । तरी तें मज ना ज्ञात । आपण ज्ञानी पुण्यव्रत । ज्ञानदृष्टि लावून पहा ।।२०।।

आपण योगींद्र महातेजयुत । साक्षात् ब्रह्म मूर्तिमंत । माझें पूर्वजन्मीचें पाप ज्ञात । करून मजसी सांगावें ।।२१।। वसिष्ठ दशरथास सांगती । सौभरि मुनि तेव्हां म्हणती । कीर्तिमान नृपा ऐक प्रचिती । तुझ्या पापाची सांप्रत ।।२२।। गणपप्रिय जें सांगत । तें ऐकण्या नृप उत्कंठायुक्त । सौभरि म्हणती पूर्वजन्मांत । पाप तुझें कांही नसे ।।२३।। अरे अधमा याच जन्मांत । तुझ्या राज्यीं पाप घडत । महामूर्खा चतुर्थीचें व्रत । परमोत्तम तें लय पावलें ।।२४।। जो मानव चतुर्थीव्रत । आद्यतम हें न आचरित । त्याचीं अन्य व्रतें निष्फळ होत । ऐसा निर्णय शास्त्राचा ।।२५।। नाना पुण्यकर्मे केलीस । परी चतुर्थीव्रत विसरलास । म्हणोनी वंध्यत्व पावलास । कारण हें जाणून घेई ।।२६।। चतुर्विध पदार्थांची दात्री । वरदा चतुर्थी संकष्टहर्ती । सर्वसुखांची ती कर्ती । ऐसा महिमा चतुर्थीचा ।।२७।। राष्ट्राकडून पाप होत । तें राजा भोगित । व्रतहीन जन समस्त । म्हणून तूं घोर पापी ।।२८।। आतां पापाची मूर्ति । तूच अससी जगतीं । नराधमा म्हणून अपत्यप्राप्ती । तुजलागीं न झाली ।।२९।। सौभरीचें ऐकून वचन । राजा म्हणे कर जोडून । चित्तीं भयभीत होऊन । विनयनम्र त्या वेळीं ।।३०।। मी अजाणतां कर्म केलें । म्हणोनी पाप मज लागलें । आता विप्रा तें व्रत भलें । सांगावें मज सविस्तर ।।३१।। पुत्रप्राप्ती मज व्हावी । पापाची जोड नष्ट व्हावी । ऐशी ज्या व्रताची थोरवी । तें करून मी होईन सुखी ।।३२।। सौभरि तेव्हां त्यास सांगत । चतुर्थीचें संपूर्ण व्रत । सर्व प्रजाजनांसह आचरित । तरी तूं होशील पापमुक्त ।।३३।। जें अज्ञानानें पाप घडत । तें या आद्यव्रतें नष्ट होत । पुण्यभाग प्राणी होत । निष्पाप त्या संसारीं ।।३४।। तदनंतर व्रताचें महिमान । विस्तारपूर्वक करी कथन । कीर्तिमान राजा कर जोडून । विनयें तदनंतर विचारी ।।३५।। हा गणाधीश कैसा असत ।

ज्याचें चतु:पद हें व्रत । ब्रह्मभूयकर ऐसें ख्यात । त्यासी भजेन मी विशेषें ।।३६।। तेव्हां तो सौभरि कथित । गणनाथमाहात्म्य तयाप्रत । शांतियोगप्रद असत । जें तारक या भवार्णवीं ।।३७।। सौभरि पूर्वेतिहास सांगत । म्हणें मी एकदा तप आचरित । नाना छंदपरायण अत्यंत । देव भयभीत तैं झाले ।।३८।। तप:प्रभावें हा द्विजोत्तम । सर्व जिंकील उत्तमोत्तम । कोणतें श्रेष्ठपद वांच्छितो हा विप्रोत्तम । आम्हांसी हें मुळीं न कळे ।।३९।। म्हणोनी सुरेंद्र पाठवित । कामदेवासी स्त्रीसहित । तपोभंग करण्या माझा त्वरित । कामदेवही त्वेषें आला ।।४०।। उर्वशी प्रमुख अप्सरांसहित । मधुमासासी संगें आणित । बाण मारुनी पीडा देत । मजसी तेव्हां कामदेव ।।४१।। परी मी तप:प्रभावें जिंकित । कामासी त्या स्त्रियांसहित । मोहहीन राहून तप आचरित । सुदृढ निश्चयें त्या वेळीं ।।४२।। माझ्या उग्र तपानें दाहयुक्त । होतां पळून कामदेव जात । इंद्रासी सर्व वृत्तांत । सांगता झाला विषण्णमनें ।।४३।। नंतर मी योगमार्गे होत । अन्तर्निष्ठ जड उन्मत्त । ऐशा मार्गांत संस्थित । योगप्रभावाकारणें ।।४४।। पुढे शुक महायोगी येत । थोर गाणपत्य माझ्या आश्रमांत । मज पाहून विचारित । काय इच्छिसी या घोर तपानें ।।४५।। तेव्हां मी होऊन प्रणत । माझे दोन्ही कर जोडून म्हणत । माझें श्रेष्ठ भाग्य असत । म्हणोनि तूं भेटलासी ।।४६।। आतां महायशा मज सांगावें । महायोग्या शांतिरहस्य आघवें । जें जाणून शांत व्हावें । चित्त माझे निरंतर ।।४७।। शुक हें ऐकून मज सांगत । चित्त पंचविध असत । तें त्यागून तन्मय होत । शांतिलाभाचा साधक ।।४८।। चित्तभूमीचा निरोध होत । तेव्हां शांतिसौख्य लाभत । चिंतामणीस भज तूं निश्चित । एकाक्षर मंत्रानें ।।४९।। त्यानें तुझें होईल दृढ चित्त । चिंतामणीवरी अविरत । जपादिक मार्ग सोडून आसक्त । होई तूं शमदम

परायण ।।५०।। गणनाथास भज तूं भक्तियुक्त । महाभागा यत्नें सतत । ऐसा उपदेश करून जात । शुक योगी स्वेच्छापरायण ।।५१।। गणेश नामाचें संकीर्तन । करी तो जपही विशेष पावन । तदनंतर मी गणपतीस भजून । आराधना केली यथोपदेश ।।५२।। पुढ्यांत मूर्ति स्थापून । केलें एकाक्षर विधान । स्वल्प काळांत शांति लाभून। आनंद मजला वाटला ।।५३।। तथापि गणनायकपूजनांत । राहिलों मी सदैव सक्त । ऐसीं दहा वर्षें जात । तेव्हां विघ्नेश प्रकटले ।।५४।। मी त्यांची पूजा करित । विविध स्तोत्रें स्तवन करित । मज गाणपत्य पद देत । नंतर गेले स्वानंदक पुरासी ।।५५।। तेव्हांपासून गणपास मी भजत । ब्रह्मनायकास सतत । ऐसें सांगून तो राजर्षि देत । षडक्षर मंत्र राजासी ।।५६।। कीर्तिमान नृप जैं परतत । अश्विन शुक्ल द्वितीया तैं असत । त्याच मासीं शुक्ल चतुर्थीव्रत । आरंभिलें त्या नृपानें ।।५७।। सर्व प्रजाननांसमवेत । उपोषण करून व्रत आचरित । माध्यान्हीं गणपतीस पूजित । विधिपूर्वक तो राजा ।।५८।। रात्रीं जागरण करित । बालवृद्धांच्या संगतींत । नरनारी जन समस्त । करिती तें व्रत यथातथ्य ।।५९।। जे जें नर माझ्या राज्यांत । शुक्ला कृष्ण चतुर्थीचें व्रत । करित नाहीत त्यांप्रत । घोर शासनें ताडावें ।।६०।। ऐसी घोषणा राज्यांत । सर्व स्थळीं तो करवित । त्यायोगें हें व्रत भूमंडळांत । प्रसिद्ध फार जाहलें ।।६१।। पुढें त्या कीर्तिमान नृपतीस लाभत । पुत्र मनोवांच्छित । तो पुत्र येतां वयांत । त्यास समर्पिलें राज्य सर्व ।।६२।। आपण वनांत जाऊन । स्त्रीसहित करी गणेशाचें भजन । अन्तीं स्वानंदलोकीं जाऊन । ब्रह्मभूत तो जाहला ।।६३।। ऐसाच वृत्तान्त अद्भुत । अश्विन शुक्ल चतुर्थीचा असत । दशरथा तो सांगेन तुजप्रत । ऐकावा लक्ष देऊनियां ।।६४।। भीम नामा महाव्याध असत ।

पापकर्मपरायण तो अत्यंत । लोकांस गाठून आडमार्गांत । ठार मारुनी धन चोरी ।।६५।। एकदा तो भीम वनांत । होता कोण्या ब्राह्मणा मारण्या उद्यत । तो ब्राह्मण भयग्रस्त । पळूं लागला वनांतरीं ।।६६।। तेवढ्यांत कोणी अश्वारूढ नर । धावत आला शस्त्रधर । भीमास पकडून सत्वर । ब्राह्मणासी भयमुक्त करी ।।६७।। तो द्विज आपुल्या आश्रमांत । तदनंतर सुखें जात । तो वीरपुरुष पकडून नेत । भीमास राजासमोर ।।६८।। तो त्या दुष्ट व्याधास ठेवित । चतुर्थी दिनीं त्या कोठडींत । अश्विन शुक्ल पक्षांत । घडला उपवास व्याधाला ।।६९।। पंचमीस त्यास वधित । त्या पुण्यें तो ब्रह्मभूत होत । ऐसे नानाविध भक्त जगांत । चतुर्थीव्रतानें तरून गेले ।।७०।। ते सर्व स्वानंदस्थ होत । त्यांचें वर्णन शब्दातीत । जो हें शुक्ल अश्विनी व्रत आचरित । ऐके त्यास सर्व सिद्धिलाभ ।।७१।। जो हें व्रतमाहात्म्य वाचित । त्यास भुक्तिमुक्ति लाभत । पुत्रपौत्रादींचा लाभ होत । मित्रपरिवार सुख लाभे ।।७२।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते शुक्लाश्विनी चतुर्थीव्रतवर्णनं नामाष्टमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय आठवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । वसिष्ठ दशरथासी सांगत । कार्तिक शुक्ल चतुर्थीचें व्रत । जे सर्वसिद्धिप्रद पुनीत । इतिहासयुक्त महोज्ज्वल ।।१।। सुधन्वा नामा नीतिसंयुत । राजा होता सूर्यवंशात । शस्त्रास्त्रबळें युक्त । परम द्युतिमंत धर्मशील ।।२।। धर्मशील उदार साधुसंमत । सत्यवचन पंचयज्ञ परायण असत । देव अतिथि विप्रांचा करित । सत्कार योग्य तो सर्वदा ।।३।। त्याची भार्या रूपशालिनी । कलावती पतिव्रता पावनी । महा उदार धर्मशील मनीं । अर्धांगी शोभे सत्यार्थे ।।४।। तो सुधन्वा

नृप जिंकित । भूमंडळ हें समस्त । तेजस्व्यांत जो श्रेष्ठ असत । पाळी पृथ्वीतें धर्मानें ।।५।। सामंत वश होते समस्त । सेना त्याची अगणित । कुबेरासम संपत्ति असत । कांही न्यून तया नव्हतें ।।६।। ऐसें अर्धे जीवन जात । तेव्हां घडे एक विपरीत । अकस्मात् नृपशरीरीं उठत । कोड भयंकर अकारण ।।७।। त्या कोडाच्या व्रणांत । असंख्य किडे लवलवत । रक्त पूं घामानें सुटत । दुर्गंध असह्य सर्वांगासी ।।८।। सुळावर नरा चढविती । त्यास जैशा वेदना होती । तैशापरी पीडा अती । कुष्ठरोगामुळें तया ।।९।। औषधें नानाविध घेत । जरी तो नृप प्रयत्नयुत । नानामंत्रप्रयोग करवित । अनुष्ठानें विप्रांकरवीं ।।१०।। वेदमंत्रांचें पुरश्चरण करवित । परी त्यापासून फळ न लाभत । म्हणोनी नाना तीर्थात । स्नान करुनी दानें देई ।।११।। तथापि कोड बरें न होत । राजा अधिकचि पीडित । तेव्हां खिन्न होऊन म्हणत । आपुल्या मंत्र्यांसी सुधन्वा ।।१२।। मी आतां जातों वनांत । आपण सांभाळा राज्य समस्त । मंत्री नागरिक दु:खी होत । सांत्वन त्यांचें करीतसे ।।१३।। नंतर आपुल्या स्त्रीसहित । नृपश्रेष्ठ जात घोर वनांत । तेथ इकडे तिकडे भटकत । गणपतीसी स्मरे तेव्हां ।।१४।। दु:खसंयुत तो चित्तांत । विघ्न टळण्या देवांस प्रार्थित । तेव्हां एक आश्चर्य घडत । अकस्मात आले पुलस्त्य मुनी ।।१५।। त्या मुनिशार्दूलासी पाहत । तैं नृप जाहला हर्षभरित । प्रियेसह प्रणाम करित । कर जोडून भक्तिभावें ।।१६।। त्या मुनिनायकासी नंतर म्हणत । कोणतें पूर्व पुण्य माझें असत । म्हणोनि तुमचें दर्शन घडत । धन्य जन्म धन्य ज्ञान ।।१७।। धन्य माझे मातापिता । तपधर्मादिक धन्य आतां । तुमच्या अंघ्रियुगाचें दर्शन पावतां । धन्य सर्वही मज वाटे ।।१८।। ऐसें जेव्हां तो म्हणत । तेव्हां पुलस्त्यमुनी त्यास विचारित । राज्य सोडून या घोर वनांत । किमर्थ भटकसी तूं राजा

।।१९।। नंतर एका वृक्षाच्या छायेंत । स्वत: बसून त्यांसी बसवित । सुधन्वा सांगे आपुला वृत्तान्त । वंदन करूनी तयासी ।।२०।। योगीन्द्र दयाळू असती । ऐसी पुराणांत ऐकली ख्याती । तयाची सत्यार्थे प्रचिती । तुज पाहून झाली मज ।।२१।। मज दु:खित जाणून । तूं दयाघना आलास धावून । साक्षात् प्रजापति महान । ब्रह्माचा सुत पुलस्त्य ।।२२।। सर्वज्ञ तूं महायोगी । दु:खार्तासी आश्रय जगीं । तरी सांग आतां मजलागीं । काय पाप मीं केलें होते? ।।२३।। धर्मनीतीनें राज्य केलें । सर्व जनांसी तोषविलें । परी भयानक कोड उठलें । सर्वांगावरी माझ्या कां? ।।२४।। ह्याचें न्याय्य कारण न समजत । पूर्वजन्माचें का पाप नडत । ते सर्व सांगून मजप्रत । उपाय त्यावरी सांगावा ।।२५।। सुधन्वाचें ऐकून वचन । कोडाची पीडा ज्यास दारुण । तेव्हां करुणापूर्ण मन । पुलस्त्य त्यास सांगती ।।२६।। वसिष्ठ दशरथासी सांगती । पुण्यप्रद ही कथा अती । पुलस्त्य सुधन्व्यासी निवेदिती । पूर्वजन्मांतील पाप न हें ।।२७।। याच जन्मीं पाप घडलें । तें तुज न समजलें । त्या पापामुळें उठलें । कुष्ठ हें भयंकर तव अंगावरी ।।२८।। नृपा तुझ्या राज्यांत । चतुर्थीचें व्रत नष्ट होत । गणेश्वरासी जें प्रिय असत । सर्वसिद्धिप्रदायक ।।२९।। चार पुरुषार्थांचें साधन । म्हणोनि म्हणती वरदा महान । कार्यारंभीं होतां विस्मरण । सर्वही निष्फळ होत असे ।।३०।। सर्व वर्ण जें करिती । त्या पापांची फलश्रुती । राजासी बाधे निश्चिती । चतुर्थीहीन सर्व प्रजा ।।३१।। त्यायोगें तूं कुष्ठें पीडित । नराधमा तूं या जगतांत । मृत्यूनंतर नरकांत । गति तुजला मिळेल ।।३२।। चार पुरुषार्थ नष्ट होत । यांत संदेह लव नसत । तें पुलस्त्यवचन ऐकून होत । परमदु:ख सुधन्व्यासी ।।३३।। तो महाप्राज्ञ पुलस्त्यास विनवित । कर जोडोनी विनययुक्त । तुम्हीं सांगितलें तें सत्य असत । नि:संशय सर्वतत्वज्ञा ।।३४।। आता

परी तें अद्भुत व्रत । मजसी सांगावें विधियुक्त । कोणाचें कैसें पूजन उक्त । कोणत्या वेळीं तें करावें? ।।३५।। माझें कोड बरें व्हावें । मज शरीरसुख लाभावें । त्यासाठीं मीं जें करावें । प्रायश्चित्त तें मज सांगा ।।३६।। व्रतलोपाचा दोष घडला । तो पाहिजे परिहारिला । त्यासाठीं सांगा मजला । उपाय सविस्तर या वेळीं ।।३७।। ऐसें सुधन्वा प्रार्थित । तेव्हां महायोगी पुलस्त्य स्मरत । गणेशासी स्वचित्तांत । नंतर सांगें हर्षभरे ।।३८।। जो अज्ञानानें दोष घडत । तो दूर करी प्रायश्चित्त । म्हणोनी त्वरित करी हें व्रत । प्रजेसह चतुर्थींचें ।।३९।। त्यायोगें कुष्ठविहीन । होशील सुरूप तूं महान । पश्चात्तापें पाप जळून । पुण्यशील तूं झालास ।।४०।। नंतर तो योगी सांगत । व्रताची कथा पुनीत । ती ऐकून हर्षयुक्त । नृपति तैं जाहला ।।४१।। त्या मुनिश्रेष्ठास प्रणाम करून । नृप म्हणे विनम्र वचन । धन्य जाहला माझा जन्म । महाव्रताची कथा ऐकली ।।४२।। ह्यासम पूर्वी ज्ञान । मी न जाणलें पावन । आता गणेशाचें स्वरूप प्रसन्न । महाप्राज्ञा सांग मजला ।।४३।। तें जाणून सर्व भावें भजेन । देवदेवेशासी भक्तियुक्तमन । ऐसें राजाचें प्रार्थनावचन । ऐकून पुलस्त्य त्यास सांगे ।।४४।। तो महायश सर्व भावज्ञ सांगत । गाणपत्य ज्ञानवंत । सुधन्व्या गणेशज्ञान अद्भुत । ब्रह्मभूयमय योगाकार ।।४५।। पूर्वी मीं योगशांति लाभण्यास । नाना योगांचें पालन विशेष । केलें यमनियमादी प्राप्त होण्यास । मनाचा विजय दमानें ।।४६।। तथापि शांति ना मज लाभत । म्हणोनी शंकरासी शरण जात । त्यास प्रणाम करून प्रार्थित । उत्तम योग मज सांगावा ।।४७।। तेव्हां त्यानें जें सांगितलें । मजला जें रहस्य निवेदिलें । तें ऐकतां तुजही चांगलें । फळ मिळेल साधनानें ।।४८।। गाणपत्य तूं होशील । त्या ज्ञानें अति विमल । श्रीशिव सांगती ऐसें निर्मल ।

गणेशरहस्य मजला तैं ।।४९।। मनोवाणीविहीन । मनोवाणीमयही जो असून । त्या योगशांतिमयासी जा शरण । भावबळें भजन करी ।।५०।। मनोवाणीमय जें जें असत । तें तें संप्रज्ञानापासून उद्भूत । गकाराक्षर जाण ख्यात । महामते तूं वेदान्त ।।५१।। मनोवाणी विहीन । तें असंप्रज्ञानापासून । णकाराक्षर संभव असून । गण त्यांतून होतसे ।।५२।। त्या गणाचा स्वामी असत । तो योगशांतीनें लाभत । चित्तभूमिनिरोधें सतत । विनायकासी त्या भजावें ।।५३।। ऐसें सांगून विराम । घेतसे महादेव अनुपम । मी त्यास करी प्रणाम । नंतर गेलों वनीं एका ।।५४।। गणेशयोगाची साधना केली । गणपति मूर्ति ध्यायिली । अष्टाक्षरे मंत्रे तोषविली । विशेषें चित्तनिग्रहभावें ।।५५।। नंतर स्वल्प काळांतरें प्राप्त । शांति मजला स्वात्म्यांत । तथापि मंत्रराजाच्या पूजनांत । जपात निमग्न मी होतों ।।५६।। ऐसीं एकवीस वर्षे जात । तेव्हां तो विनायक प्रकटत । भक्तां अनुग्रहकारक जगांत । वर देण्यासी मजलागीं ।।५७।। त्यास पाहून प्रणत । पूजिलें मीं यथोचित । कौथुम नामाष्टकें स्तवित । महाप्रभूसी त्या वेळीं ।।५८।। गाणपत्य मज करून । त्यानें केलें नंतर गमन । स्वानंदक पुराप्रत पावन । तेव्हांपासून भजतों मीं ।।५९।। गणनायका भावें उपासत । ऐसें सुधन्व्यास सांगत । नंतर त्या नृपास देत । अष्टाक्षर मंत्र महायोगी ।।६०।। पुलस्त्य तेव्हां विधिसमन्वित । राजासी ऐसा मंत्र देत । नंतर राजा स्वनगरांत । परतून गेला प्रसन्न ।।६१।। आपुल्या सर्व प्रजाजनांस । आदेश देई तो त्या समयास । कार्तिक शुक्ल चतुर्थीस । करा भजन गणेशाचें ।।६२।। त्या दिवशीं उपवास करून । पंचमीस करा पारणें पावन । आपणही तें व्रत आचरून । ब्राह्मणांसी दान अन्न देई ।।६३।। नंतर झाला कुष्ठविहीन । जनाधिप तो महान । कामदेवासम लाभून । शोभन

रूप उत्तम ।।६४।। त्याचे सर्व जन होत । वंध्यत्वादी दोषरहित । रोग दु:खें विलया जात । ह्या व्रताच्या आचरणानें ।।६५।। गणेश्वराचें हें महानव्रत । तो नृप करी जगीं प्रकाशित । तेव्हांपासून जन व्रत करित । शुक्ल व कृष्ण कार्तिक चतुर्थी ।।६६।। त्यायोगें आनंद पावत । विविध सुखें ते उपभोगित । नंतर सुधन्वा नृप स्थापित । स्वपुत्रासी राज्यावरी ।।६७।। आपण निवास करी एकांतांत । गणपतीसी भजे सतत । अंतीं स्वानंदग होत । ब्रह्मभूत तदनंतर ।।६८।। त्याचे सर्व प्रजाजन । स्वानंदस्थ त्याच्या समान । ऐसें हें अति महान । चरित्र कथिलें तुज राजा ।।६९।। याचा महिमा सर्वा सिद्धि देत । माहिष्मती नगरींत । चांडाळ एक निवसत । पाप ज्यानें बहु केले ।।७०।। कार्तिक शुक्ल चतुर्थी दिनीं जात । तो एकदा वनांत । त्याचा पाठलाग तैं करित । वाघ एक भयंकर ।।७१।। तेव्हां तो चांडाळ चढत । एका वृक्षावरी तेथ बसत । वाघ वृक्षाखालीं थांबत । प्रतीक्षा करित तयाची ।।७२।। ऐसा संपूर्ण दिन जात । रात्रीही जागरण घडत । उपवास झाला अजाणत । त्या चांडाळास त्या तिथीला ।।७३।। नंतर दशरथा नवल घडत । वनांतला एक महासर्प चढत । त्याच वृक्षावरी अवचित । जेथ होता तो चांडाळ ।।७४।। त्यास पाहून भयभीत । कापूं लागला क्षुब्धचित्त । झाडावरून खालीं पडत । व्याघ्रे पकडिलें तयासी ।।७५।। पंचमी तिथीस त्यास भक्षित । तेव्हां तेथ विमान येत । बैसूनी त्या विमानांत । स्वानंदपुरा तो गेला ।।७६।। अज्ञानपणीं केलें व्रत । तरी त्यास पुण्य लाभत । गणपाप्रत तो जात । योगपर ब्रह्मभूत ।।७७।। ऐसे असंख्य जन असत । जे चतुर्वर्ग फळ लाभत । जे जे आचरिले चतुर्थीव्रत । ते ते ब्रह्मभूत जाहले ।।७८।। कार्तिक शुक्ल चतुर्थीचें महिमान । नृपा तुज कथिलें शोभन । आतां पुढे काय तें ऐकण्या

मन । उत्सुक असे सांग मजला ।।७९।। हे माहात्म्य जो ऐकत । अथवा वाची भक्तियुक्त । तो सर्वार्थ सिद्धियुक्त होत । पुत्रपौत्रांसह गणपप्रिय ।।८०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते कार्तिकशुक्लचतुर्थीव्रतवर्णनं नाम नवमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय नववा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ राजा वसिष्ठांस प्रार्थित । ऐकून कथा हर्षलों चित्तांत । आतां मार्गशीर्ष शुक्लचतुर्थीचें व्रत । सविस्तर मज सांगावें ।।१।। वसिष्ठ तें मान्य करून । इतिहास सांगती पुरातन । ह्या दिवशीं जो घडला महान । तया दशरथ नृपासी ।।२।। काशीराजा अजातशत्रू असत । पुण्यकीर्ति सर्व शास्त्र पारंगत । नाना धर्मपरायण उपासत । देव द्विज अतिथींसी ।।३।। प्रजेचें पालन यथाशास्त्र करित । त्यास भेटण्या एकदा अवचित । आले नारद मुनी त्यास नमित । भक्तिभावें पूजी तया ।।४।। स्वतःत्यांचे पाय चुरित । हर्षभरें नारदा म्हणत । धन्य माझा जन्म वाटत । पुत्रादि राज्य कंटकरहित ।।५।। धन्य माझे मातापिता । तुमच्या चरणद्वयांचें दर्शन होतां । आतां सर्वसार सांगून चित्ता । योगशांति ज्ञान द्यावें ।।६।। ज्या ज्ञानानें या संसारांत । दुःखमुक्त मानव होत । ऐसें सांगा ज्ञान अद्भुत । तेव्हां बोले नारद ।।७।। गाणपत्य अग्रणी तो योगी सांगत । वचन तेव्हां हर्षयुक्त । योग्य प्रश्न तूं मजप्रत । केलास नृपा ऐक आतां ।।८।। सर्वांसी ब्रह्मप्रद शांतिदायक । सांगेन तुज योग निःशंक । ब्रह्म नानाविध पावक । वेदांत वर्णिलें पात्रभेदें ।।९।। त्यांत ब्रह्मभूतत्व मुख्य असत । ब्रह्मणस्पति नामें विराजत । गणेशास भज तूं भावयुक्त ।

चित्तवृत्ति निरोधानें ।।१०।। चिंतामणि स्वयें होशील । मीच गणेश हें जाणशील । संदेह जेव्हां न संभवेल । संयोग अयोगात्मक ।।११।। तेव्हां शांति तुज लाभेल । तुझ्या राज्यांत अमल । चतुर्थीचें व्रत सबल । नष्ट जाहलें सांप्रत ।।१२।। त्यायोगें राज्य नष्ट होत । तेव्हां तूं पडशील नरकांत । जरी व्रताचें या आचरण घडत । तरी होशील पापमुक्त ।।१३।। धर्मार्थ काममोक्षप्रद । ऐसें हें चतुर्थी व्रत सुखद । संकटहारक वरद । जें करतां सिद्धि सर्वत्र ।।१४।। नाना कर्मे सिद्धिस्तव करिती । परी चतुर्थी व्रता विसरती । प्रयत्न त्यांचे निष्फळ होती । म्हणोनी करी चतुर्थी व्रत ।।१५।। करुणायुत महायोगी सांगत । माहात्म्य त्या नृपाप्रत । चतुर्थीसंभव अद्भुत । तें ऐकून नृप म्हणे ।।१६।। गणेशाचें उपासन । सांगावा मार्ग हा शोभन । ब्रह्मणस्पतीचें महिमान । ऐकून सांप्रत तोषलों मीं ।।१७।। नारद तेव्हां नृपास म्हणत । एकाक्षर विधानें भक्तियुक्त । ढुंढि विनायका भज एकचित्त । तेणें साध्य तो होईल ।।१८।। प्रत्यक्ष दर्शन तुज घडेल । म्हणोनि त्या नृपास अमल । एकाक्षर मंत्र सुनिर्मल । सांगोपांग त्या वेळीं ।।१९।। नंतर मार्गशीर्ष शुक्ल चतुर्थी येत । ती यथाविधि तो नृप आचरित । आपुल्या प्रजाजनांसमवेत । सर्वसुखप्रदायिनी ।।२०।। सदैव हें व्रत करित । आपुल्या राज्यांत दवंडी करित । जे नराधम हें न आचरित । शुक्लकृष्ण चतुर्थी व्रत ।।२१।। त्यांसी दंड होईल महान । परी जे करतील व्रत पावन । त्यांसी गणराजाचें वरदान । लाभेल सुख शाश्वत ।।२२।। नृपाध्यक्ष नित्य पूजित । ढुंढिराजासी भक्तियुक्त । ऐसा बहुत काळ जात । तेव्हां प्रकटले गजानन ।।२३।। त्या नृपास ते म्हणत । वर माग राजा मनोवांच्छित । नृप प्रणाम करून स्तवित । ढुंढिराजासी पूजोनियां ।।२४।। अजात शत्रूस गाणपत्य करित । ईप्सित वर देऊन अंतर्हित । ढुंढिराजासी भजत । अनन्यचित्त

तो राजेंद्र ।।२५।। अंतीं नागरिकांसमवेत । गणपासमीप तो जात । सर्वांसह ब्रह्मभूत होत । योगिसंमत तो नृप ।।२६।। अन्यही एक कथा असत । तीही सांगतों तुजप्रत । एका वेश्येसी लाभत । ह्या व्रतानें गणेशमुक्ती ।।२७।। कोणी एक नरमोहिनी । मिथिला नगरीं वेश्या कामिनी । आली तेव्हां तिज पाहोनी । मोहित झाले सर्व जन ।।२८।। राजानें तिचा संमान । केला दिलें बहुत धन । तेथ करूनियां निवास शोभन । तीर्थयात्रा तिनें केल्या ।।२९।। ऐसीच एकदा तीर्थाप्रत । गेली होती वेश्या तेथ येत । राक्षस कोणी दुष्ट अत्यंत । पकडून नेलें तिला तैं ।।३०।। तिज बंदी करून नेत । आपुल्या घराकडे हर्षयुक्त । त्यास पाहून विलाप करित । भयोद्विग्न ती वेश्या ।।३१।। राक्षस तिचें सांत्वन करीत । परी ती शोक न सोडित । मार्गशीर्ष चतुर्थी शुक्ली येत । मार्गांत तेव्हां काय घडलें ।।३२।। अतिशोकें ती वेश्या न घेत । अन्नजलादिक कांहीं मुखांत । त्या उपोषणयोगें मरत । पंचमीस ती भयभीत ।।३३।। तेव्हां गणेशदूत नेत । स्वानंदपुरीं तिज क्षणांत । ब्रह्मभूत ती वेश्या होत । व्रतपुण्याच्या प्रभावें ।।३४।। जरी अज्ञानानें घडत । वरदाख्य हें व्रत । तरीही ब्रह्मसायुज्य प्राप्त । जाणून करितां लाभ किती? ।।३५।। मार्गशीर्ष शुक्ल चतुर्थी व्रत । जो नर भावें आचरित । त्यास सर्वार्थ लाभत । कथा ऐकतां वाचितांही ।।३६।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते मार्गशीर्षशुक्लचतुर्थीव्रतवर्णनं नाम दशमोऽध्याय: समाप्त:। श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय दहांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दशरथ प्रार्थी वसिष्ठाप्रत । मार्गशीर्ष शुद्ध

चतुर्थीचें व्रत । ऐकून झालों संतृप्त । गुरुसत्तमा महाभागा ।।१।। आतां पौषमासीं वरदायिनी । चतुर्थी जी जीवनीं । माहात्म्ययुक्त असोनी । तारक होते मनुजासी ।।२।। त्या चतुर्थीचें महिमान । सांगावें मजसी उत्तमोत्तम । वसिष्ठ तेव्हां सांगती वचन । सांगतों तुज संक्षेपें तें ।।३।। विस्तारपूर्वक कथन । असंभव असें म्हणून । स्वल्प परी गुणसंपन्न । ऐसा वृत्तान्त ऐकावा ।।४।। अवंती नगरींत ब्राह्मण असत । सुदंत नामा विख्यात । तो सर्व शास्त्रांत पारंगत । राजपुरोहित नीतिज्ञ ।।५।। धर्मशास्त्रानुसार राजाप्रत । देई बोध नीतियुक्त । बृहद्रथ राजा वश असत । सुदंताच्या ह्या कारणें ।।६।। नानाधर्मकर तो भूमि पाळित । सुदंताचा उपदेश ऐकत । सुदंताची भार्या असत । विलासिनी नांवाची ।।७।। ती कर्मदोषें वंध्या होत । पतिव्रता मनीं दु:खित । तिची अपत्यें उपजतांच मरत । म्हणोनि कष्टी तें दांपत्य ।।८।। ब्राह्मणें केलें बहुत दान । विविध व्रतांचें करी आचरण । तथापि अपत्य न जगून । पुत्रसौख्य त्यांस नव्हतें ।।९।। सुदंत तो राजपुरोहित । होवोनिया अति दु:खित । भार्येसह गेला वनांत । भ्रांतचित्त भटके तिथें ।।१०।। जीवनांत रस ना वाटत । मरण्याचा निश्चय करित । म्हणोनि दृढ तपातें बैसत । तेथ योगींद्र वामदेव आले ।।११।। त्यांची पूजा करून । भक्तीनें कर जोडून । सुदंत ब्राह्मण बोले वचन । खेदयुक्त त्या वेळीं ।।१२।। माझें दु:खिताचें जीवन । तप वय तैसेंचि ज्ञान । तुझ्या पादपद्माचें होतां दर्शन । धन्य झालें सर्वही ।।१३।। मज नसे संतान । वंध्यादोषें दु:खित मन । मृत्यूनंतर स्वर्गहीन । योगींद्रा काय होईल मम गती ।।१४।। वामदेव सुदंतासी सांगत । ऐक महाभागा तूं धर्मसंयुत । तथापि पापाचारी जगांत । कां झालास तें ऐक आतां ।।१५।। अवंतीपुरपालाचा तूं पुरोहित । तो राजा जें महापाप करित । तेंचि तुझ्या हातून घडत । लोप जाहला चतुर्थी व्रताचा ।।१६।।

त्यायोगें भूमिमंडळांत । भूवासीजन समस्त । चतुर्वर्ग फळांनीं हीन होत । धर्माचरण जरी अन्य घडलें ।।१७।। राजासम तूंही आचरित । धर्म जरी निष्ठावंत । तरी व्रतलोपानें दु:खित । सांप्रत तूं झालास ।।१८।। ऐसें ऐकून वचन । वामदेवाचें सुदंत उदास होऊन । त्या बुद्धिमंता विनयें नमून । विस्मयपूर्वक विचारी तैं ।।१९।। तें हितकारक व्रत । कोणतें तें सांगा त्वरित । चार पुरुषार्थाचा लाभ होत । त्यानें कैसा तें वर्णावें ।।२०।। ह्या व्रतानें जो नर हीन । तो जगांत फलहीन । दयासागरा माझें मन । उत्सुक ऐकण्या व्रतमहिमा ।।२१।। ऐसी प्रार्थना ऐकत । महायोगी वसिष्ठ कथा पुढती सांगत । वामदेव सांगे माहात्म्य तयाप्रत । सुदंतें ऐकिलें विस्मयें ।।२२।। पुन्हां विचारी विप्राप्रत । गणेशज्ञानांत चित्त रमत । गाणपत्य महामुनीसी विनत । गणाधीश हा कैसा असे? ।।२३।। कैसें तयाचें स्वरूप असत । जाणून भजेन भक्तिसमन्वित । तेव्हां वामदेव म्हणत । सुदंता ऐक उत्तम ज्ञान ।।२४।। जें जाणतां भक्तिभावित । गाणपत्य तूं होशील जगांत । मी पूर्वी यत्नसंयुत । तपोनिष्ठ जगीं ख्यात ।।२५।। माझ्या तपानें व्याप्त । जाहलें होतें चराचर समस्त । नंतर योगासाठीं मीं त्यागित । तपश्चर्या ब्राह्मणोत्तमा ।।२६।। शमदमपर होऊन । अंतर्निष्ठ मन करून । मनावरी जय मिळवून । योगभूमि क्रमानें ।।२७।। सहज स्थितींत झालों स्थित । येथ तेथ मी संचार करित । मोहहीन स्वाधीनयुक्त । नंतर शांतिकाम मीं झालों ।।२८।। योग त्यागून शांतिलाभार्थ करित । ब्रह्मावरी मन केंद्रित । जें मनोवाणीविवर्जित । स्वाधीनता जाणण्यासी ।।२९।। निर्मोहिता कैसी लाभेल । ऐसा विचार चित्तीं सबल । काय करावें कार्य सफल । उत्कंठा ऐसी चित्तांत ।।३०।। नंतर योगिवंद्या शंकरासी शरण । जाऊन झालों मीं शैव सुमन । शैवमार्गी मज रत पाहून । शंभू म्हणाले मजलागीं

।।३१।। वामदेवा महामते आगमन । कां केलेंस सांगा प्रयोजन । तुमचा वृत्तांत ऐकून । प्रिय करीन मी तुमचें ।।३२।। तेव्हां करांची ओंजळ जोडून । महादेवासी तैं नमून । भक्तवांच्छाकल्पतरूस मीं निवेदन । माझें हृद्‌गत सर्व केलें ।।३३।। स्वेच्छामय जें शैव ब्रह्म । सहज तैसें जें परम । त्याहून परतें कांहीं सम । जगीं कैसें संभवेल? ।।३४।। तथापि संशय दूर करावा । ब्रह्मभूत होता शैव बरवा । स्वेच्छाभाव तेथ असावा । हें कैसें संभवेल? ।।३५।। स्वाधीनता दोषयुक्त । सहज न पर ज्ञात । म्हणोनि शांति लाभार्थ उत्कंठित । तुझ्या दर्शना मीं आलों ।।३६।। योगशांतिप्रद जें पूर्ण असत । तें करुणानिधे मजप्रत । सांगावें आपण ऐसें प्रार्थित । ऐकून शंकर तुष्ट झाला ।।३७।। सर्व योगज्ञ गाणपत्यस्वभाव । तयासी म्हणे श्री शिव । योगशांतिप्रद जाण अभिनव । गणेश एक जगांत ।।३८।। त्या परब्रह्मास योगसेवापर । जाण तूं शांतिदाता अमर । स्वानंदापासून थोर । चतुर्था जो जाहला ।।३९।। असत्य सत्य सम सहज । या चारांचा योग सुखज । स्वानंद नामे तो अज । परिकीर्तित जाहला ।।४०।। अयोगांत संयोग न होत । कोणत्याही ब्रह्मांचा जगांत । गकाराक्षर ज्ञान अद्भुत । जाणावें निज बोधानें ।।४१।। णकाराक्षर जें ज्ञान । तें निवृत्तीनें पावे जन । त्यांचा स्वामी गणेशान । योगरूप कथिला असे ।।४२।। शांतीनेच तो लाभत । शांतास शांतिदाता जो असत । चित्त पंचविध ख्यात । बुद्धिरूप यांत न संशय ।।४३।। मोहात्मिका जी सिद्धि असत । ती सिद्धि मायाद्वय असत । त्यांचें बिंब गणेश पुनीत । बिंबिभाव प्रभो सोडावा ।।४४।। आतां तूं गणनाथ होशिल । संशय यांत न राहील । ऐसें सांगून वामदेवा अमल । एकाक्षर मंत्र देई ।।४५।। विधिपूर्वक तो मंत्र । महादेव करुणायुक्त देत । तो स्वीकारून प्रणाम करित । वामदेव महेशासी ।।४६।। नंतर मीं

जात वनांत । गणनाथा भजे भक्तिसंयुत । एकाक्षर विधानें संतुष्ट होत । गणनायक मजवरी ।।४७।। योगशांति ती परमा देत । भक्तवात्सल्ययोगें मजप्रत । म्हणोनि मी होत । योगिवंद्य सर्वत्र संमत ।।४८।। तथापि त्या विघ्नहराचें भजन । नित्य केलें मी एकनिष्ठ मन । ऐसें दहा हजार वर्षें उपासून । गणाधीशा तोषविलें ।।४९।। तेव्हां तो माझ्या आश्रमांत। पुनरपि वर देण्या येत । घनगंभीर शब्दें म्हणत । वामदेवा वर माग ।।५०।। महाभागा जें हृदयेप्सित । तें तें पुरवीन समस्त । तुझ्या भक्तीनें मीं तृप्त । योगिसत्तमा जाहलों ।।५१।। गणेशाचें ऐकून वचन । संपविलें मीं ध्यान । वरती उठून केलें वंदन । पूजून गणेशस्तुति केली ।।५२।। गणेशा तुज सदा नमन । स्वानंदवासी तुज अभिवादन । सिद्धिबुद्धिपते तुज वंदन । विघ्नेशा तुज पुनः पुन्हां ।।५३।। मूषकारूढासी हेरंबासी। भक्तवांच्छापूरकासी । ढूंढिराजा तुज देवासी । नमन माझें रक्षी मजला ।।५४।। आदिमध्यांतहीनासी । आदिमध्यांतरूपासी । शंकरप्रियपुत्रा तुजसी । लंबोदरा नमन माझें ।।५५।। नाना मायाधरासी । मायिकां मोहदायकासी । मायामायिकभेदें क्रीडा करिसी । वंदन तुज मनोभावें ।।५६।। विष्णुपुत्रासी शिवपुत्रासी । ब्राह्मणासी ब्रह्मपुत्रासी । सर्वेशासी सर्वपुत्रासी । नमन तुज सर्वात्मका ।।५७।। सर्वांच्या मातापित्यासी । महोदरासी देवेंद्रपासी । ज्येष्ठासी महोग्रासी । महेशासी नमन असो ।।५८।। विष्णूसी प्रभविष्णूसी । अमृतासी सूर्यासी । नाना शक्तिस्वरूपासी । पुरुषासी नमन असो ।।५९।। प्रकृतीसी गुणेशासी । गुणात्म्यासी एकासी । अनेकात्मकासी विघ्नकर्त्यासी । योग्यांच्या पतीस नमन ।।६०।। योगासी योगनाथासी । स्तवितों मी गणेशासी । मनोवाणीविहीनासी । मनोवाणीमया नमन ।।६१।। ऐसी जेव्हां तो स्तुति करित । तेव्हां निमग्न भक्तिरसांत । अंगावरी रोमांच फुलत । कंठ

त्याचा दाटला ।।६२।। देहभान विसरून नृत्य करित । विघ्ननाशक वामदेवास म्हणत । वर माग महाभागा चित्त स्थित । तुझ्या स्तोत्रें संतुष्ट मीं ।।६३।। हें स्तोत्र सर्वसिद्धिप्रद होईल । वाचका पाठकासी अमल । पुत्रपौत्रादिक लाभतील । धनधान्यही प्राप्त होय ।।६४।। गणेशाचें ऐकून वचन । वामदेव म्हणे प्रसन्न मन । ब्रह्मेशा ब्रह्मभावित पावन । भक्ति देई गणाधीशा ।।६५।। गाणपत्य ती विशेषयुत । एवढाचि वर मीं मागत । अन्य काहीं न इच्छित । तुष्ट जरी तूं विघ्नपा ।।६६।। तथास्तु म्हणून अन्तर्धान । पावले तेव्हां गजानन । वामदेव प्रसन्नमन । गाणपत्य श्रेष्ठ जाहला ।।६७।। तेव्हांपासून शांति लाभत । मजसी जी अभिनव असत । म्हणून तूं गणराजा भज निश्चित । शांतिलाभ तुज होईल ।।६८।। एकाक्षर मंत्र तैं देत । विधिपूर्वक स्वीकारी सुदंत । ॐ गँ या पदांनी युक्त । जप त्याचा करूं लागे ।।६९।। वामदेव मुनि अन्तर्धान । पावले तेव्हां परतून । आपुल्या स्थानासी उत्सुक मन । गणनायका भजू लागे ।।७०।। राजानें त्याचें केलें स्वागत । तोही गणनायका भजत । बृहद्रथासी सर्व वृत्तान्त । सांगितला त्यानें सविस्तर ।।७१।। त्याची आज्ञा मानून । राजा करी व्रताचें पालन । घोषणा राज्यांत करून । नागरिकां जागृत केलें ।।७२।। तदनंतर पौषमासांत । जी शुद्ध चतुर्थी येत । ती प्रजाजनांसह आचरित । यथाविधि भक्तिभावें ।।७३।। व्रताचरणमात्रें होत । मुनिपत्नी गर्भयुक्त । सुत लाभला योग्य काळांत। ज्ञानयुक्त चिरायू ।।७४।। तेव्हांपासून भूमितलावर । उत्तम व्रत हें आचरिती सर्व । शुक्लकृष्ण चतुर्थीचें अपूर्व । रोगादी सर्व नष्ट झाले ।।७५।। सर्व प्रजा पुत्रादि संयुत । जाहली धनधान्ययुक्त । अंतीं निमग्न स्वानंदांत । सुदंत योगिवंद्य जाहला ।।७६।। योगसेवा प्रभावें नृपही लाभत । गणेशाचें ज्ञान अद्भुत । गाणपत्य तो प्रख्यात । ऐसा प्रभाव

या व्रताचा ।।७७।। तरी नृपा ऐक पुनरपि वृत्त । धनप्रिय वैश्य मार्गात। एकदा व्यापारानिमित्त । श्रमला म्हणोनि विश्रामला ।।७८।। तेथ चोरांनी हल्ला करून । लुटिलें त्याचें सर्व धन । त्यांच्या शस्त्राघातें विद्ध होऊन। पडला तो धरणीवरी ।।७९।। चोर गेले पळून । वैश्य पडला वनांत खिन्न । विलाप करी अति करुण । दैवयोगें तेथ चतुर्थी आली ।।८०।। ती पौष शुक्ला चतुर्थी असत । योगायोगें उपवास घडत । जलही त्यास न लाभत । प्राशनार्थ वनांत ।।८१।। पीडा दारुण शरीरांत । वेदना व्याकुळ निद्रा न लाभत । जागरण जाहलें सहजगत । पंचमीस मेला तो पापी ।।८२।। धनलुब्ध धनप्रिय त्वरित । अज्ञानें व्रत घडलें जगांत । म्हणोनी स्वानंदलोकीं जात । गणपास पाहून मुक्त झाला ।।८३।। व्रताच्या महिम्यानें ब्रह्मभूत । तो धनलोभीही होत । ऐसें हें व्रत अति अद्भुत । सेविता जन मुक्त होती ।।८४।। संसारसागर तरती । इहलोकीं अखिल भोग भोगिती । ते वर्णनातीत असती । ऐसा प्रभाव व्रताचा ।।८५।। हें पौष चतुर्थी महिमान । वाचील वा ऐकेल भक्तियुक्त मन । राजा, त्यास लाभतील पावन । इहपरलोकीं सर्व सुखें ।।८६।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते पौषशुक्लचतुर्थीमाहात्म्यवर्णनं नामैकादशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय अकरांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ म्हणे वसिष्ठाप्रत । चतुर्थीचें महिमान वाटत । अमृताहूनही सुरस मजप्रत । आनंद माझा वाढला ।।१।। माझी तृप्ति न झाली । माघ शुक्ल चतुर्थीची कथा राहिली । ती सांगावी मज भली । जेणें सुखलाभ सर्व जनांसी ।।२।। वसिष्ठ सांगती तयाप्रत ।

माघ शुक्ल चतुर्थी दिनी जन्म होत । विनायकाचा कश्यपाच्या घरांत । साक्षात् मंगळयुक्त नृपा ।।३।। मुद्गल निवेदिती दक्षास । वसिष्ठोक्त कथा ती सुरस । देवांतक वधाश्रित जी सुधेसम जनांस । ऐकून मोद दशरथासी ।।४।। अजनंदन मोदयुक्त । त्या व्रतार्थ प्रेरित । त्याचा आदर ओळखून हर्षयुक्त । गाणपत्येंद्र नृपसत्तमा म्हणे ।।५।। वसिष्ठ म्हणे इतिहास पुरातन । तुजला दशरथा सांगेन । जो ऐकता पूर्णत्व लाभून । नरोत्तमा सुख लाभतें ।।६।। कर्णाट प्रांतीं भानुपुरींत । सोमनामा धर्मयुक्त । देव विप्र अतिथींच्या पूजेंत । सदैव रत जो होता ।।७।। शस्त्रास्त्रज्ञ वीर्यवंत । राज्य करी तो नीतियुक्त । भूमंडळ सर्व जिंकित । सुराज्य उत्तम तो करी ।।८।। त्याची भार्या यशोवती । पूर्ण पतिव्रता जी होती । धर्मशीला दानपरायण ती । होती अत्यंत रूपशालिनी ।।९।। दीर्घकाल राज्य उत्तम । त्यानें केलें अनुपम । अनावृष्टिभव दु:ख परम । प्राप्त झालें पुढें तयासी ।।१०।। शौनक नामक मुनींप्रत । दु:खनिवृत्तीस्तव तो जात । सर्वार्थकोविद जे निवसत । गाणपत्य प्रशांत वनांत ।।११।। महावनीं त्या जाऊन । त्या मुनीस करून अभिवादन । साष्टांग नमस्कार करून । करांजली जोडितसे ।।१२।। सोम त्या मुनिश्रेष्ठास म्हणत । अत्यंत विनयानें युक्त । धन्य माझा जन्म असत । तुमचें दर्शन झालें म्हणोनि ।।१३।। माझें कर्मादि धन्य वाटत । तें ऐकून शौनक म्हणत । स्वपरभावविवर्जित । सर्वशास्त्रार्थ कोविद तो ।।१४।। राजा महाभागा या वनांत । किमर्थ आलास दु:खित । या दुर्गम वनांत । काय वृत्तान्त सर्व सांग ।।१५।। मुनींद्र ऐसें विचारित । तेव्हां सोमराजा त्यास म्हणत । वेदज्ञमुनीस हर्षयुक्त । ऐका माझा पूर्व वृत्तान्त ।।१६।। कर्णाटात माझी वसती । धर्मयुक्त केलें राज्यनीती । परी सांप्रत अवचिती । दुष्काळ पडला राज्यांत ।।१७।। मी नीतियुक्त राज्य पाळिलें । परी हें परम दु:ख ओढवलें ।

प्रजाजनही सर्व गांजले । पापयोगें अज्ञातशा ।।१८।। तरी उपाय सांगा मजप्रत । आपण योगीश्वर साक्षात । राज्य सोडून शरणागत । शरण आलों मी तुम्हांसी ।।१९।। त्याचें तें विनत वचन ऐकत । तेव्हां शौनक मुनिशार्दूल म्हणत । ऐक राजा तुझ्या राज्यांत । पाप दारुण जें घडलें ।।२०।। त्या पापानें रोगयुक्त । लोक झाले वंध्यतायुत । अनावृष्टी अवचित पीडित । त्याचें कारण सांगेन ।।२१।। चतुर्थीचें नष्ट व्रत । शुक्लकृष्ण पक्षांत । तरी प्रयत्नपूर्वक आतां त्वरित । आचरी तें व्रत नृपा तूं ।।२२।। अन्यथा वर्ष सहस्रें जरी लोटलीं । तरी सुखशान्ति न संभवली । म्हणोनि पाहिजे केली । उपासना तूं गणेशाची ।।२३।। सर्वत्र विख्यात जें व्रत । त्याचें माहात्म्य सांगतों तुजप्रत । ते ऐकतां नृपाचें चित्त । विस्मययुक्त जाहलें ।।२४।। पुनः विचारी शौनकाप्रत । मुनिसत्तमा सांगा मजप्रत । गणेशाचें स्वरूप शांतियुक्त । विप्रा निवेदन करावें ।।२५।। राजा पूर्वी मी तपमग्न वसत । अंतर्निष्ठ माझ्या आश्रमांत । ब्रह्मचिंतनपर तेथ येत । महायोगी भृगुमुनी ।।२६।। त्यांचें आगमन अकस्मात । माझ्या अनुग्रहार्थ होत । त्यांस पाहून प्रणत । आसनीं बसवून पूजी तयासी ।।२७।। हात जोडून विनम्र पुढ्यांत । मज पाहुनी भृगुमुनि म्हणत । तूं काय इच्छिसी तें मजप्रत । महाभागा सांग सारें ।।२८।। योगनिष्ठा तुज शान्ति प्राप्त । जाहली का सांग मजप्रत । आमुच्या कुळीं साधुगुणान्वित । महाभागा तूं अससी ।।२९।। तेणें मीं जाहलों तृप्त । पुरवीन तुझें वांच्छित । तदनंतर प्रणाम करून तयाप्रत । शौनक सांगे हृद्गत ।।३०।। योगशांतिप्रद योग । पूर्णत्वें सांगावा सलग । तेणें तृप्ति पावेन सांग । तुमच्या अनुग्रहाने मीं ।।३१।। भृगु तेव्हां त्यास सांगत । योगशांतिमय पुनीत । गणेश ब्रह्मनायक विश्वांत । विधिपूर्वक त्यासी भजावें ।।३२।। तेणें तूं होशील शांत । पंचविध चित्त असत । तेथ

चिंतामणि निवसत । त्यास जाणून ब्रह्मभूत ।।३३।। बाळा झाले ब्रह्मादि समस्त । चित्तानें जें होय ज्ञात । तेथ मोह प्रवर्तत । त्याग करी मोह चित्ताचा ।।३४।। ऐसा त्याग करून । स्वयं चिंतामणी होऊन । मनोवाणीमय चित्त जाणून । जाणते त्या विवर्जित ।।३५।। ऐशा उभयविध चित्ताचा त्याग करी । तरीच सुखाची आशा करी । ऐसें सांगून उपदेश करी । गणानां त्वा या मंत्राचा ।।३६।। शौनकासी गणेशमंत्र देऊन । भृगु पावला अन्तर्धान । शौनक म्हणे तो जपून । मी चित्तनिग्रहीं रत झालों ।।३७।। क्रमें योगिवंद्य होत । गणराजाची कृपा लाभत । तरीही त्याचें भजन न सोडित । वरद झाला तै भक्तवत्सल ।।३८।। मज गाणपत्य तो करी । तेव्हांपासून मी आजवरी । गणप होऊन चित्तांतरीं । घेत अनुभव आनंदाचा ।।३९।। ऐसें सांगून त्या राजेंद्राप्रत । शौनक गणेश मंत्र देत । गणानां त्वा हा पुनीत । विधियुक्त तो मुनिशार्दूल ।।४०।। शौनकासी प्रणाम करून । राजसत्तम गेला परतून । आपुल्या नगरांत प्रसन्न । प्रधान स्वागत करिती तैं ।।४१।। तदनंतर जी माघशुक्ल चतुर्थी येत । त्यापासून व्रत तें आचरित । शुक्ल चतुर्थीचें हें व्रत । विख्यात केलें तयानें ।।४२।। सर्व प्रजानन व्रत आचरिती । त्यायोगें पुण्य संचयाची शाश्वती । त्याप्रभावें पर्जन्याची वृष्टी । होऊन हर्षयुक्त झाले जन ।।४३।। गणेशभजनांत झाले रत । त्या नृपाचे प्रजाजन समस्त । वरदाख्य गणेशासी पूजित । नित्य आदरपूर्वक ।।४४।। पुत्रपौत्रांच्या संगतींत । उत्तम राज्य करी नृप भक्त । लोक सर्व मग्न सुखांत । रोगवंध्यत्व वर्जित झाले ।।४५।। स्वधर्मनिरत होऊन । भजती ते गणनायकासी प्रसन्न । गणेशासम अन्य न मानून । परमादरें पूजती तया ।।४६।। सोमराजा अन्तीं जात । गणेशलोकीं तो पुनीत । स्वानंदलोकीं ब्रह्मभूत । प्रणाम करी गणेशासी ।।४७।। नृपा तुज सांगितलें चरित ।

एक अन्यही असत । सुंदर जें व्रतसंभूत । सर्वपापप्रणाशक ।।४८।। कौंडिण्य नगरांत अंत्यज वसत। भानुनामा महापापी दुर्वृत्त । दुष्ट कर्मपरायण अत्यंत । परस्त्रीलंपट तो होता ।।४९।। मद्यपान द्यूतांत रत । सदा गाठून मार्गांत । द्रव्यलोभी ठार मारी जनां अवचित । पापें ऐसी बहु झालीं ।।५०।। ब्राह्मणांचा वध करित । दुष्टकर्मा तो सतत । दैवयोगें एकदा वनांत । अंत्यज तो फिरत होता ।।५१।। परी कोणी पांथस्थ न येत । म्हणोनि प्रतीक्षेंत बैसत । माघी शुक्ल चतुर्थी ती असत । उपवास त्यास योगें घडला ।।५२।। अन्नजलही न मिळून । पर्वत गुहेंत राहिला बसून । कांहींच वनांत न मिळून । व्याकुळ झाला क्षुधातृषेनें ।।५३।। ऐसी संपूर्ण रात्र घालवित । प्रभात होतां जाय गृहाप्रत । तृषार्त तो प्याला जल त्वरित । भराभर त्या वेळीं ।।५४।। परी त्या पाण्यांत । होतें बहुधा विष उग्र अत्यंत । तेणें दु:ख होऊन प्राप्त । ओकून पडलें सर्व पाणी ।।५५।। तत्क्षणीं त्याचा मृत्यू होत । तेव्हां येती गणेशदूत । ते तयासी आदरें नेत । गणपासन्निध त्या वेळीं ।।५६।। गणेशदर्शन होतां पाप नाशित । पापी होय तो ज्ञानयुक्त । गणनाथाचें सायुज्य लाभत । त्या पुण्यप्रभावें ।।५७।। न जाणतां घडलें व्रत । तेणें तरला अंत्यज अवचित । महापापी होत ब्रह्मभूत । सूर्यवंशज तो प्रसिद्ध ।।५८।। ऐसी माघ शुक्ल चतुर्थी असत । पुण्यकरी अत्यंत । तिचें महिमान वर्णनातीत । कोण वर्णूं शकेल? ।।५९।। ऐसें हें व्रत करून । नाना जन ब्रह्मभूत झाले पावन । चतुर्थीचे हें माहात्म्य ऐकून । वाचिता होतो सिद्धिलाभ ।।६०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते माघशुक्लचतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम द्वादशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय बारांवा संपूर्ण)